माण देशी
बँक

रजि. नं. एस.ए.टी. / माण/बी.एन.के./ओ./११९, सन १९९६
दि. ३१/१०/९६, एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१ पी.

# माण देशी
## महिला सहकारी बँक लि., म्हसवड

ता. माण, जि. सातारा



२० वा वार्षिक अहवाल सन २०१६-२०१७

ऑडीट वर्ग 'अ'



नोट बंदीच्या कालावधीमध्ये माण देशी महिला बँकेने आठवडा बाजार सुरळीत चालावा या उद्देशाने बाजारामध्ये पाचशे रूपयांची नोट स्विकारून दहा रूपयांच्या नाण्यांचे वाटप करून सुट्ट्या पैशांची अडचण दूर केली.




माण देशी बँकेमार्फत ''आठवडा बाजार कर्ज योजना'' व ''गटकर्ज वाटप योजना'' यामधील कर्जदार व सहकर्जदारांचा विमा उतरविला जातो. या योजनेअंतर्गत पतीचे निधन झालेल्या एका महिला कर्जदारास विम्याच्या रक्कमेचा धनादेश देताना बँकेच्या संचालिका सौ. अश्विनी पवार सोबत इतर कर्मचारी




दि. ३० मार्च २०१७ रोजी माण देशी महिला बँक, शाखा धायरी येथे मा. डॉ. अजित कुमार CAB Faculty Member RBI, Pune व अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बँकेस भेट देऊन बँकेच्या कार्याची माहिती घेतली. समवेत श्रीमती चेतना सिन्हा व माण देशी बँकेच्या संचालिका सौ. वनिता पिसे



दि. २८ मार्च २०१७ रोजी वर्ल्ड सेंटर, मुंबई येथे झालेल्या सहाव्या ''ग्लोबल इकॉनॉमिक समिट'' मध्ये गृहराज्य मंत्री मा. श्री. दिपक केसरकर यांच्या हस्ते माण देशी महिला बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. रेखा कुलकर्णी यांना ''नारी शक्ती'' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



दि. ०७ फेब्रुवारी २०१७ रोजी मा. श्री. आशुतोष गोवारीकर चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माते यांनी माण देशी बँकेस भेट देवून महिलांशी हितगूज साधले त्याप्रसंगी माण देशी महिला बँकेच्या संचालिका व संस्थापक सभासद महिला



दि. ०६ जानेवारी २०१७ रोजी माण देशी महोत्सव, मुंबई येथील कार्यक्रमामध्ये मा. श्रीमती श्यामला गोपीनाथ, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या माजी उपगर्व्हनर व अध्यक्षा एचडीएफसी बँक यांनी भेट देवून उद्योजिका महिलांच्या कार्याची माहिती घेतली समवेत श्रीमती चेतना सिन्हा व सौ. रेखा कुलकर्णी

# २० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, आपल्या बँकेची २० वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. ०२/०९/२०१७ रोजी दुपारी १२ वाजता तृप्ती मंगल कार्यालय, सातारा-पंढरपूर रोड, म्हसवड येथे बँकेच्या अध्यक्षा मा. श्रीमती चेतना विजय सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी होणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

## • सभेपुढील विषय •

१. दि. २४/०९/२०१६ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०१७ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक वाचून स्वीकृत करणे.
३. दि. ३१ मार्च २०१७ अखेरच्या संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा विभागणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४. सन २०१६-२०१७ चे शासकिय लेखापरिक्षण अहवाल व दोषदुरुस्ती अहवाल वाचून नोंद घेणे.
५. सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
६. सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत हिशोब तपासणीसांची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
७. सन २०१७-२०१८ सालच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०१६-२०१७ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
८. संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
९. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेले पोट नियम दुरुस्तीस मंजूरी देणे.
१०. स्टाफिंग पॅटर्न मंजूरीबाबत निर्णय घेणे.
११. माण देशी महिला सहकारी बँक व माण देशी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविलेल्या उपक्रमांची चर्चा करुन नोंद घेणे.
१२. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१३. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशावरुन
**माण देशी महिला सह. बँक लि. म्हसवड**

स्थळ :- म्हसवड
दिनांक १९/०८/२०१७

**सौ. रेखा सु. कुलकर्णी**
मुख्य कार्यकारी अधिकारी

विशेष सुचना :-
१. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा घेणेत येईल. त्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२. कामकाजासंदर्भात विचारावयाचे प्रश्न आणि सूचना दि. २६/०८/२०१७ पूर्वी बँकेच्या कार्यालयात मिळतील अशा रितीने पाठवाव्यात.
३. बँकेचा ३१/०३/२०१७ चा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक हे बँकेच्या नोंदणीकृत मुख्य कार्यालय व शाखांच्या नोटीस बोर्डावरती उपलब्ध करुन देण्यात आले आहे, तसेच बँकेची वेबसाईट www.manndeshibank.com वर संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक प्रसिद्ध केले आहे.

**सन्माननीय सभासद भगिनींनो,**

माण देशी महिला सहकारी बँकेस सन २०१६-१७ साल हे आव्हानात्मक व नाविन्यपूर्ण राहिले. यावर्षी भारतातील नागरिकांना नोटबंदीचा सामाना करावा लागला. त्याचे पडसाद ग्रामीण भागातील नागरिकांवर मोठ्या प्रमाणावर दिसून आले. नोटा चणचणीचा अनुभव बरेच काही शिकवून गेला. नोट बंदीच्या काळात आपल्याकडे ५००/१००० रुपयांचे नोटांचे महत्वच संपले. दिवसभर, मोलमजूरी करुन ३०० रु. कमविणारा कष्टकरी वर्ग, त्याला स्वत:च पैशासाठी दिवसभर रांगेत उभे राहायला लागायचे. पाचशे आणि हजार रुपयांच्या नोटांवर बंदी आल्यानंतर छोट्या चलनामध्ये निर्माण झालेल्या टंचाईला माण देशी बँकेचा आधार मिळाला. छोट्या घटकांकडून अगदी चिल्लर स्वरुपात बँकेने जमा केलेले हे धन चलन टंचाईच्या काळात समाजाच्या उपयोगाला आले. नोटबंदीच्या काळात, माण देशी बँकेने फिरत्या व्यवसाय शाळेचा उपयोग करुन आठवड्या बाजारात व्यवसाय करणाऱ्या लोकांना नोटा बदलून देण्याची संधी उपलब्ध करुन दिली. बँकेने आपल्या खातेदारांना पाचशेची नोट घेवून त्या बदल्यात तेवढ्याच किंमतीची १० रुपयांची नाणी देवून सुट्ट्या पैशाची अडचण दूर केली. परिणामी, आठवड्या बाजारातील नोटांची चणचण दूर होवून व्यवहार सुरळीत चालू झाले. याची नोंद देशपातळीवर घेतली गेली.

संपूर्ण भारत '' डिजिटल '' बनविणेची चर्चा जोर धरु लागली आहे. त्यात माण देशी महिला बँक देखील अग्रेसर राहिली आहे. रुपे कार्डचा वापर करुन आपल्या ग्राहकाला बँकेने ई-कॉमर्स ची सुविधादेखील उपलब्ध करुन दिली आहे. या सुविधेद्वारे, आजच्या इंटरनेटच्या जगात वेळ व कष्ट वाचवून ऑनलाईन कोणत्याही वस्तूची खरेदी ग्राहक करु शकतो. याव्यतिरिक्त मोबाईल रिचार्ज, वीज बिल अथवा कोणत्याही प्रकारचे बिल रांगेमध्ये उभे न राहता मिनिटासरशी भरु शकतो.

नोटबंदीनंतर महिलांशी चर्चा केलेनंतर महिला एटीएम, मोबाईलद्वारे पैसे भरायला/काढायला फारच उत्साही दिसून आल्या. महिलांच्या या उत्साहामुळे माण देशीने घरपोच ''डिजिटल फायनान्सिअल लिटरसी'' ची सुविधा सुरु केली आहे. याबरोबरच बँकेच्या शाखांमध्ये ''एटीएम'' मशिनची सोय देखील करुन देण्यात येणार आहे.

माण देशी बँक सूक्ष्म वित्त पुरवठा करते. सूक्ष्म वित्त पुरवठ्यानंतर महिलांनी आपले व्यवसाय चांगलेच वाढविले आहेत. आता, त्यांची कर्जाची मागणीदेखील वाढली आहे. व्यवसाय वाढीसाठी त्या २ लाखापासून ५ लाखापर्यंत कर्ज मागणी करत आहेत. महिलांची ही गरज लक्षात घेवून माण देशी बँकेने ''उन्नती कर्ज '' योजना यावर्षी सुरु केली आहे. या योजनेद्वारे महिलांची मोठ्या रक्कमेची कर्जाची मागणी पूर्ण होवून त्या स्वत:चा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर वाढवू शकणार आहेत.

स्त्री म्हणून, गरीब वा इतर कारणाने समाजामध्ये मागे राहिलेल्या माण देशी महिलांनी जागतिक बाजारपेठेत आपली स्वत:ची वेगळी ओळख छोट्या-मोठ्या व्यवसायातून निर्माण केली आहे. छोट्या व्यवसायांतून मोठी पत व प्रतिष्ठा मिळविली आहे. या माण देशी उद्योगिनींनी स्वत:बरोबर आपले व कुटूंबाचे जीवनमान उंचवले आहे.

सर्व महिला स्वत:चे निर्णय स्वत: घ्यायला समर्थ व्हाव्यात, तसेच कुटूंबाचा आणि समाजाचा समान व बहुमोल घटक म्हणून त्यांचा सन्मान व्हावा, ही माण देशीची दृष्टी आहे. महिलांना यशस्वी उद्योजिका होण्याकरीता ज्ञान, कौशल्य, धैर्य, संधी आणि भांडवल पुरवणे जेणेकरुन त्यांना स्वत:च्या आयुष्यावर ताबा मिळविणे शक्य होईल यासाठी माण देशी सतत झटत असते. महिलांच्या हातात पैसा यावा, त्यांचे उत्पन्न वाढावे, मालमत्ता वाढावी आणि त्यांच्या वैयक्तिक तसेच कौटुंबिक जीवनात महिलांची निर्णय शक्ती वाढावी हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून माण देशी पाऊले उचलीत आहे. सन २०२२ पर्यंत दहा लाख महिलांना अशा पद्धतीने सामर्थ्यवान करणे, हे माण देशी समोरील ध्येय आहे.

**आपली स्नेहांकित,**
**श्रीमती चेतना सिन्हा**
**अध्यक्षा**

# चालू वर्षातील घडामोडी

माण देशी महिला सहकारी बँकेने २१ व्या वर्षात पदार्पण केले आहे. दुष्काळी माण तालुक्यातील कष्टकरी महिलांच्या आर्थिक सबलीकरणाच्या प्रमुख उद्देशाने चेतना सिन्हा यांनी माण देशी महिला सहकारी बँकेची स्थापना केली. कारण महिला सक्षम झाल्यानंतर देश सक्षम होईल. या कार्यामुळे गेल्या वीस वर्षाच्या कालखंडात माण देशी महिलांना खऱ्या अर्थाने सक्षमीकरणाची चालना मिळू शकली.

सन २०१६-१७ ची विशेष बाब म्हणजे, माण देशी महिला बँकेने ई कॉमर्स बँकिंग सुरु केले आहे. चालू आर्थिक वर्षात बँकेच्या म्हसवड शाखेमध्ये एटीएम मशिन सेवा सुरु करायची आहे. बँकेच्या सर्व शाखांमध्ये टप्पाटप्प्याने एटीएम मशिन बसविण्याचा बँकेचा मानस आहे.

रुपे डेबिट कार्ड, एटीएम सेवा आपल्या शाखांमध्ये सुरु आहे. बँकेच्या ग्राहकांना रुपेकार्ड वापरण्याची सोय उपलब्ध करुन देण्याबरोबरच आठवडे बाजारात व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी हे कार्ड वापरण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. यामुळे ग्राहकांना त्यांच्या दारात म्हणजेच व्यवसायाच्या ठिकाणी एटीएमच्या माध्यमातून सेवा पुरविण्याची सोय निर्माण झाली आहे. याबरोबरच माण देशी बँकेने आरटीजीएस, एनईएफटी व एसएमएस बँकिंगसारख्या सुविधा देखील सुरु आहेत.

## बँकेने ग्राहकांसाठी उपलब्ध केलेल्या सेवा:

**१. कोअर बँकिंग:** बँकेने कोअर बँकिंग प्रणालीचा अवलंब केला असून बँकेच्या सर्व ग्राहकांसाठी एसएमएस बँकींगची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. ज्या ग्राहकांनी बँकेकडे आपल्या मोबाईल नंबरची नोंदणी केली अशा सर्व ग्राहकांना त्यांच्या खात्यावरील प्रत्येक व्यवहाराच्या नोंदी एसएमएस द्वारे कळविल्या जातात.

**२. रुपे डेबीट कार्ड:** बँकेने अत्याधुनिक मायक्रो एटीएम मशीन व रुपे डेबीट कार्ड च्या सहाय्याने आठवडा बाजारात बसून व्यवसाय करणाऱ्या महिलांना त्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणीच सर्व आर्थिक व्यवहार करता यावेत याची सोय उपलब्ध करुन दिली आहे. बँकेने ईएमव्ही रुपे डेबीट कार्ड व विक्री केंद्र (POS) सेवा सुरु केली आहे. याद्वारे ग्राहकांना शॉपींग मॉल्स, पेट्रोल पंप, हॉटेल्स, इन्शुरन्स इ. ठिकाणी रुपे कार्ड द्वारे पेमेंट करणे शक्य आहे. बँकेने रुपे कार्ड अंतर्गत ग्राहकांना एटीएमची २४×७ सुविधा उपलब्ध करुन दिली असून देशांतर्गत इतर कोणत्याही बँकेच्या एटीएम मधून पैसे काढणे शक्य झाले आहे.

**३. आधारकार्ड बेस्ड पेमेंट सिस्टिम:** बँकेने आधारकार्ड बेस्ड पेमेंट सिस्टिमचा अवलंब केला असुन या प्रणालीद्वारे ग्राहकांना शासनाकडून मिळणारे सर्व प्रकारचे अनुदान त्यांच्या खात्यावर थेट जमा केले जाते. या योजनेअंतर्गत खातेदारास गॅस सबसिडीची रक्कम, ठिबक सिंचनापोटी मिळणारे अनुदान तसेच शासकीय/निमशासकीय उदा: एल.आय.सी., प्रॉव्हीडंट फंड इ. कडून येणे रकमा आपल्या बँकेतील खात्यात थेट जमा करता येतात. अजूनही ज्या खातेदारांनी आपला आधार कार्ड क्रमांक नोंद केला नाही त्यांनी तो नोंद करुन सदर योजनांचा लाभ घ्यावा असे बँकेतर्फे आवाहन करण्यात येत आहे.

**४. आय.एफ.एस.कोड:** बँकेचा आय.एफ.एस.कोड(YESBOMAN001) असुन तो प्रत्येक चेकवर तसेच पासबुकवर नमुद आहे. या कोडद्वारे बँकेच्या खातेदारास देशांतर्गत कोणत्याही बँकेकडून रक्कम आपल्या बँकेतील खात्यावर थेट जमा करता येईल.

**५. आरटीजीएस व एनईएफटी:** बँकेने इनवर्ड व आऊटवर्ड आरटीजीएस व एनईएफटीची सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध करुन दिली आहे. आऊटवर्ड आरटीजीएसने देशांतर्गत कोणत्याही बँकेच्या खात्यात आपल्या बँकेच्या खात्यातील रक्कम ट्रान्सफर करता येईल व इनवर्ड आरटीजीएसच्या माध्यमातून रक्कम स्वीकारली जाईल.

**६. सीटीएस क्लिअरींग सुविधा:** बँकेने ग्राहकांना सीटीएस क्लिअरींगची सुविधा उपलब्ध करुन दिली असून या प्रणाली अंतर्गत देशातील कोणत्याही शहरातील चेकची रक्कम (जर संबंधित बँक सीटीएस क्लिअरींगची मेंबर असलेस) दुसऱ्या दिवशी संबंधीत खातेदाराच्या खात्यात थेट जमा केली जाते.

**७. पॅन कार्ड:** बँकेने आपल्या ग्राहकांसाठी नवीन पॅन कार्ड काढणेची सुविधा उपलब्ध करुन दिली असून ज्यांना पॅन कार्ड काढावयाचे असेल त्यांनी जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.

**८. वीज बील:** बँकेच्या शाखांमध्ये वीज बील स्वीकारण्याची सोय उपलब्ध आहे.

**९. हेल्प लाईन:** ग्राहकांना हेल्प लाईन म्हणून बँकेने टोल फ्री नंबर उपलब्ध करुन दिला आहे. तो नंबर १८००-२१२-२११२ हा आहे.

**१०. ई-कॉमर्स सुविधा:** रुपे डेबिट कार्ड च्या सहाय्याने आता आपण इंटरनेट च्या युगात वेळ व कष्ट वाचवून घर बसल्या कोणत्याही वस्तूची खरेदी करु शकतो. वीज बील, फोन बील अथवा कोणत्याही प्रकारचे बील रांगेमध्ये उभे न रहाता मिनिटासरशी भरु शकतो. डिश टिव्ही, मोबाईल रिचार्ज देखील करु शकतो.

**रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांची माण देशी बँकेस भेट:** दि. २१ एप्रिल २०१७ व २५ मे २०१७ रोजी रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांनी माण देशी बँक, शाखा धायरी, पुणे येथे भेट देवून बँकेने नव्याने सुरु केलेल्या मायक्रो-एटीएम सुविधा, गट कर्ज वाटप, आठवडा बाजारात व्यवसाय करणाऱ्या महिलांना कर्ज वाटप या योजनांची माहिती घेवून माण देशी बँकेच्या लाभार्थी महिलांशी चर्चा केली.
माण देशी बँक महिला उद्योजिका घडविणे हा उद्देश उराशी बाळगून महिला उद्योजिकांना भांडवल व माण देशी फौंडेशनमार्फत महिलांना प्रशिक्षण देवून त्यांना सबल करते. जगभरात माण देशीच्या दुहेरी संगमाचे (घरपोच भांडवल व घरपोच व्यवसाय प्रशिक्षण लाभ मिळवून देणारे) माण देशी रोल मॉडेल हे एकमेव मॉडेल आहे.

**नाबार्डतर्फे आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रम:** नाबार्ड व माण देशी महिला बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. हे प्रशिक्षण कार्यक्रम सातारा जिल्ह्यातील माण देशी बँकेच्या कार्यक्षेत्रात ४० गावांमध्ये राबविण्यात आले. या कार्यक्रमात महिलांना बचत, कर्ज संदर्भात तसेच पाण्याचे नियोजन कसे करावे याबाबत माहिती देण्यात आली. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नाबार्डतर्फे ४.३२ लाख रुपयांचे अर्थसहाय्य मिळाले आहे.

**नोट बंदीच्या काळात माण देशी बँकेतर्फे आठवडा बाजारात राबविण्यात आलेला उपक्रम:**
नोटबंदीच्या काळात माण देशी बँकेने म्हसवड, गोंदवले, दहिवडी व वडूज येथील आठवडा बाजारादिवशी माण देशी फौंडेशनच्या मोबाईल बसद्वारे १० रुपयांच्या नाण्यांचे वाटप केले. पाचशे रुपयाची बंद झालेली नोट स्विकारुन त्याबदल्यात १० रुपयांची सुट्टी नाणी देवून आठवडा बाजारात भासत असलेली सुट्ट्या पैशांची चणचण दूर केली. परिणामी, आठवडाबाजारातील व्यवहार सुरळीत होण्यास मदत झाली.

# २० वा वार्षिक अहवाल सन २०१६-१७

## भागभांडवल :-

बँकेचे अधिकृत भागभांडवल रु. ७ कोटीचे आहे. वर्ष अखेरीस रु. ५४३.७० लाख एवढे जमा झाले आहे. या वर्षात भागभांडवलात रु. २६.३३ लाख इतकी वाढ झालेली असून ही वाढ ५.०९ % एवढी आहे. वर्षाअखेर एकूण २५८० नवीन सभासद झाले तसेच मृत्यू राजीनामा इत्यादीमुळे ३४३४ सभासद कमी झाले. त्यामुळे वर्षाअखेर एकूण सभासद संख्या २४९७८ झाली आहे.

## गंगाजळी व निधी :-

मागील वर्षाअखेर गंगाजळीसह इतर निधी रु. २०७.०९ लाख होती. अहवाल वर्षात त्यात रु. १८.४५ ने वाढ होऊन अहवालवर्षा अखेर गंगाजळी, थकव्याज निधी,राखीव निधीची रक्कम रु. २२५.५४ लाख इतकी झाली आहे. या वर्षात वाढीचे शेकडा प्रमाण ८.९१ % इतके आहे.

## ठेवी व विमा संरक्षण :-

मार्च २०१६ च्या ठेवी रु. ८७८२.०७ लाखावरुन मार्च २०१७ अखेर रु. ८९४२.०० लाख एवढ्या झाल्या आहेत. ही वाढ रु. १५९.९३ इतकी असून, ठेव वाढीचे प्रमाण १.८२% आहे. या वाढत्या व बदलत्या स्पर्धेत ठेव वाढी बरोबर नफा क्षमता वाढविणे हे ही महत्वाचे आहे त्यामुळे ठेवीच्या व्याजावरील खर्चाचे प्रमाण विचारात घेता ठेवीवरील व्याज दर कमी करावे लागले तरीही आपण एवढ्या ठेवी गोळा केल्या. सभासदांचा,ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास स्पष्ट आहे. सर्व ठेवी डिपॉझिट इन्श्युरन्स आणि क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन (DICGC) अंतर्गत सुरक्षित आहेत. त्यांची दर सहामाही विम्याच्या हप्त्याची रक्कम डी.आय.सी. जी.सी. (DICGC) कडे बँक भरते.

## कर्ज :-

गतवर्षी येणे कर्ज रु. ५१९९.५२ लाख इतके होते या वर्षी त्या मध्ये रु.४८६.४१ लाख एवढ्या रकमेची वाढ झालेली आहे. एकूण कर्ज मार्च २०१७ अखेर ५६८५.९३ लाख एवढे आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकाप्रमाणे योग्य तारणी कर्ज वाटपाबद्दल केलेल्या मार्गदर्शना प्रमाणे कर्जवाटप करणे आवश्यक असलेने,चालू वर्षात आम्ही कर्ज प्रकारात वाढ करुन नवीन कल्पना आपल्यापुढे ठेवणार आहोत, स्थानिक लोकांना कर्ज उपलब्ध करुन देण्याची योजना राबविणार आहोत, बँकेचे ठेवीदारांशी, खातेदारांशी, कर्जदारांशी नेहमी सलोख्याचे संबंध असावेत म्हणून त्यात आम्ही नेहमी भर घालतो.

## अग्रक्रम क्षेत्रात कर्ज :-

भारतीय रिझर्व बँक धोरणाप्रमाणे एकूण कर्जाच्या ४०% कर्ज अग्रक्रम क्षेत्रास असावे. आपल्या बँकेत २०१६-२०१७ सालात सुद्धा अग्रक्रम क्षेत्रास ९१.१९% कर्जवाटप केलेले आहे. ही आपली अभिमानाची बाब आहे. तसेच दुर्बल घटकांना ८७.३८% कर्जवाटप केले आहे.

## थकबाकी व कर्जवसुली :-

बँकेच्या आर्थिक उन्नतीमध्ये कर्जवाटप व त्यावरील व्याजाची व हप्त्यांची परिणामकारक वसुलीचा फार मोठा वाटा आहे. त्या दृष्टिने बँकेने सतत पाठपुरवठा केल्यामुळे अहवाल वर्षात थकबाकी चे प्रमाण नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळे थकबाकीचे प्रमाण ३.०८% इतके आहे व वसुली ९६.९२% झाली आहे. व NPA चे प्रमाण २.३३% आहे.

## संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे :-

बँकेच्या एकाही संचालकाकडे बँकेचे कर्ज नाही.

**नफा वाटणी :-** २०१६-१७ या वर्षाच्या नफ्याची वाटणी खालील प्रमाणे सुचविण्यात येत आहे.

| चालू सालचा नफा | ५६५११९३.९६ | |
|---|---|---|
| तपशील | रक्कम | % |
| राखीव निधी | १४१२८००.०० | २५% |
| लाभांश (५%) | २४०१९१६.०० | |
| इमारत निधी | ८३६४७७.९३ | |
| गुंतवणूक चढउतार निधी | १००००००.०० | |
| एकूण | ५६५११९३.९६ | |

## शाखा विस्तार :-

बँकेला सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, पुणे, कोल्हापूर व रायगड या सात जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्राची मान्यता मिळालेली आहे. भविष्यात बँक या सात जिल्ह्यांत शाखांचे विस्तारीकरण करणार आहे. बँक शाखा विस्तारासाठी RBI ला प्रस्ताव पाठविणार आहे.

## सभासदांची वर्गवारी:-

महाराष्ट्रातील मागासवर्गीय महिलांना एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देणारी आपली पहिलीच महिला बँक आहे.

१) मागासवर्गीय - २८%   २) ओ.बी.सी. - २०%   ३) एन्. टी. १८%   ४) ओपन - ३४%

## गुंतवणूक:-

बँकेने दि. ३१/३/२०१७ या वर्षात रु. ३०१०.९४ लाख इतकी गुंतवणूक केलेली आहे. सरकारी रोखेमध्ये गुंतवणूक २२९६.५८ लाख व इतर बँकेमध्ये ७१४.३६ लाख गुंतवणूक केलेली आहे.

## अंतर्गत तपासणी -

बँकेचे ३१/३/२०१७ अखेर संपणाऱ्या सहकारी वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षण संगीता एस. अग्रवाल पुणे चार्टर्ड अकौटंटस यांनी केले असून त्यांनी बँकेस बहुमोल सूचना व मार्गदर्शन केले आहे.

## प्रशिक्षण कार्यक्रम:-

दरवर्षीप्रमाणे सन २०१६-१७ मध्ये माण देशी बँकेद्वारे संचालक व कर्मचाऱ्यांना कर्ज, वसुली गट कर्ज वाटप, कॅशिअर, बँकिंग सॉफ्टवेअर संदर्भात प्रशिक्षण देण्यात आले. याशिवाय खालील विषयावंर प्रशिक्षण देण्यात आले.

| अ. क्र. | प्रशिक्षण विषय | प्रशिक्षणार्थी | प्रशिक्षक |
|---|---|---|---|
| १. | संगणक प्रणाली प्रशिक्षण | सर्व शाखाधिकारी व कर्मचारी | श्री. धनंजय भोकरे व श्री. शक्ती गुरव- ईडीपी व आय टी ऑफिसर, माण देशी बँक |
| २. | कर्ज मूल्यमापन व कर्ज निरीक्षण, कर्ज कागदपत्रे, ताळेबंद विषयक प्रशिक्षण | विभाग प्रमुख व शाखाधिकारी | दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि. |
| ३. | माहिती सुरक्षा धोरणविषयक (इनफॉरमेशन सिक्यूरिटी पॉलीसी) प्रशिक्षण | विभाग प्रमुख, शाखाधिकारी व कर्मचारी | श्री. संजीव मित्रगोत्री- माहिती तंत्रज्ञान सल्लागार |
| ४. | ॲन्टी मनी लॉड्रींग व युनिफीकेशन विषयक प्रशिक्षण | सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी | श्री. सुनिल सबनीस व श्री. स्वप्नील देसाई- माहिती तंत्रज्ञान सल्लागार |
| ५. | स्वच्छता, सुव्यवस्था व देखभाल (हाऊस किपींग)विषयक प्रशिक्षण | सर्व कर्मचारी | श्री. विजयकुमार-मनुष्यबळ विकास सल्लागार |
| ६. | आर्थिक साक्षरता प्रशिक्षण | बँक सभासद | नाबार्ड अधिकारी व माण देशी बँक कर्मचारी |

## अभिनंदन:-

**● माण देशी चॅम्पियन क्रीडा संकुल मधील खेळाडू कु. वैष्णवी सावंत रा. पुळकोटी ता. माण हिची रयत शिक्षण संस्थेमार्फत**
**''आंतरराष्ट्रीय स्कूल फेडरेशन '' च्यावतीने फ्रान्स येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये निवड करण्यात आली.**

**● माण देशी चॅम्पियन क्रीडा संकुल मधील खेळाडू कु. सरिता भिसे रा. धुळदेव ता. माण हिची महाराष्ट्र हॉकी संघाच्या कॅप्टन पदी निवड झाली.**
**माण देशी परिवारातर्फे या दोघींचे हार्दिक अभिनंदन .......... !**

*********

## श्रद्धांजली:-

अहवाल सालात बँकेचे जे ज्ञात, अज्ञात, सभासद, ग्राहक, ठेवीदार, हितचिंतक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ज्या थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या तसेच देशाच्या सीमारक्षणासाठी ज्या शूर जवानांनी आत्मबलिदान केले त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धाजंली.

## बँकेची वैशिष्ट्ये

- ✻ व्यापारी बँकापेक्षा ठेवीवर अर्धा टक्का अधिक व्याज.
- ✻ नवीन पॅनकार्ड काढण्याची सुविधा
- ✻ आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी. व एस.एम.एस. बँकींग सेवा उपलब्ध.
- ✻ अत्याधुनिक मायक्रो ए.टी.एम. मशीन व रुपे डेबीटकार्डच्या साहाय्याने आर्थिक व्यवहार
- ✻ चेक ट्रंकेशन सिस्टिम (सी.टी.एस.)
- ✻ रुपये १ लाख पर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण
- ✻ वीजबीले स्विकारण्याची सोय ✻ महिलांसाठी UTI पेन्शन योजना
- ✻ आठवडे बाजार करणाऱ्या महिलांसाठी जागेवरच कर्जाची उपलब्धता.
- ✻ आठवडे बाजार करणाऱ्या व जे.एल.जी. कर्जदार महिलांसाठी आर्युविमा संरक्षण.
- ✻ जेष्ठ नागरीकांच्या ठेवीवर ०.५% अधिक व्याज
- ✻ व्यक्तीगत जिव्हाळा आणि तत्पर व घरपोच सेवा.

## ठेवीचे व्याजदर

| | |
|---|---|
| सेव्हिंग्ज ठेव ३% | ३६६ दिवस ते ४५६ दिवस ७.५% |
| १५ दिवस ते ४५ दिवस ४.५% | ४५७ दिवस ते ५ वर्षापर्यंत ८.५% |
| ४६ दिवस ते ९० दिवस ५% | दामदिडपट ठेव-४ वर्षे ६ महिने २१ दिवस |
| ९१ दिवस ते १८० दिवस ५.५% | दामदुप्पट ठेव -७ वर्षे ९ महिने १४ दिवस |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस ६.५% | ५ वर्षाच्या पुढे - ९% |

✻ जेष्ठ नागरिक ०.५% जादा व्याजदर

## बँकेचा शाखा विस्तार

शाखा म्हसवड फोन: (०२३७३) २७०११९
शाखा वडूज फोन: (०२१६१) २३२४७०
शाखा सातारा फोन: (०२१६२) २३८५२२
शाखा गोंदावले बु।। फोन: (०२१६५) २५८०१४
शाखा दहिवडी फोन: (०२१६५) २२०३८०
शाखा लोणंद फोन: (०२१६९) २२६०९०
शाखा धायरी, पुणे फोन: (०२०) २४६९०३८८

**शाखा म्हसवड व वडूज येथे लॉकर सुविधा उपलब्ध आहे.**

**शाखा गोंदवले येथे लॉकर सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे.**

## ✻ बँकर्स ✻

दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑप बँक लि. मुंबई
सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. सातारा
बँक ऑफ बडोदा, दहिवडी
बँक ऑफ महाराष्ट्र शाखा-म्हसवड, गोंदवले बु।।
बँक ऑफ इंडिया शाखा - बुध, दहिवडी
आय.डी.बी.आय म्हसवड, राणंद, लोणंद, पुणे
एस.बी.आय. वडुज, दहिवडी, सातारा, ॲक्सीस बँक सातारा
यस बँक, पुणे

### शासकीय लेखापरिक्षक

करमरकर नाईक ॲण्ड असोसिएटस्
चार्टर्ड अकौटंटस्, चिपळूण

### अंतर्गत लेखापरिक्षक

संगीता एस. अग्रवाल पुणे चार्टर्ड अकौटंटस्

### कायदेशीर सल्लागार

ॲड. भोईटे विलासराव एन. (सातारा)
ॲड. माने एस. एम. (म्हसवड)
ॲड. काझी एन. एच. (म्हसवड)

# लेखापरीक्षण अहवाल

प्रति,
दि. चेअरमन/मुख्य कार्यकारी अधिकारी
माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड
ता. माण जि. सातारा

संदर्भ: आपले नियुक्ती पत्र क्र. मुख्य कार्यालय- ८४२/०९/२०१६ दि. २६।०९।२०१६

१. आम्ही माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड या बँकेच्या सोबत जोडलेल्या दि. ३१.०३.२०१७ च्या ताळेबंदपत्रे व त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या नफा/तोटा पत्रकाचे तसेच सदर आर्थिक पत्रकांचा भाग असणारी महत्वपूर्ण आर्थिक धोरणे व अन्य अनुषंगिक माहिती यांचे लेखापरिक्षण केले आहे. आर्थिक वर्ष १.०४.२०१६ ते ३१.०३.२०१७ या कालावधीच्या आर्थिक पत्रकांमध्ये आम्ही लेखापरिक्षण केलेल्या ७ शाखा व मुख्य कार्यालय यांच्या आर्थिक व्यवहारांचा समावेश आहे.

## व्यवस्थापनाची आर्थिक पत्रकांबाबतची जबाबदारी

२. सदरची आर्थिक पत्रके हि बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९, रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक तत्वे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० मधील तरतूदीना अनुसरुन बनविण्याची जबाबदारी बँकेच्या व्यवस्थापनाची आहे. सदरच्या जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करताना आवश्यक असणाऱ्या अंतर्गत नियंत्रणासाठीचे नियम तयार करणे, त्यांची अंमलबजावणी करणे व वेळोवेळी त्यामध्ये सुधारणा करणे आदि बाबींचा समावेश होतो की, ज्यामुळे सदरची आर्थिक पत्रके ही कोणत्याही प्रकारच्या गंभीर चुका अथवा दोष विरहित होतील.

## लेखापरिक्षकांची जबाबदारी

३. आमची जबाबदारी ही आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या आधारे त्या आर्थिक पत्रकावर मत नोंदविण्याची आहे. आम्ही आमचे लेखापरिक्षण हे दि इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकौटंटस ऑफ इंडिया यांनी निर्देशित केलेल्या ऑडिटींग स्टॅन्डर्डस्ना तसेच बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा १९६० व रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन केलेले आहे. त्या स्टॅन्डर्डनुसार आम्ही आमचे लेखापरिक्षणाचे नियोजन व प्रत्यक्ष लेखापरिक्षण नियोजन व प्रत्यक्ष लेखापरिक्षण अशा पद्धतीने करणे अपेक्षित आहे की, जेणे करुन त्या आर्थिक पत्रकांमध्ये गंभीर स्वरुपाच्या चुका नाहीत, याची रास्त खात्री करुन घेतली जाईल.

४. आर्थिक पत्रकांमधील रक्कमांच्या संदर्भातील व इतर माहितीच्या संदर्भातील पुरावे नमुना तत्वांवर तपासण्याचा अंतर्भाव लेखापरिक्षणामध्ये होता. लेखापरिक्षणाच्या पद्धतीची निवड ही लेखापरिक्षकांचे अनुमान तसेच आर्थिक पत्रकांमध्ये चुका अथवा अफरातफर यामुळे गंभीर दोष निर्माण होण्याच्या शक्यतेची पडताळणी आदी बाबी गृहित धरुन केली जाते. अशा जोखमींची पडताळणी करुन योग्य अशी लेखापरिक्षण पद्धती निवडताना लेखापरिक्षक प्रामुख्याने बँकेने आर्थिक पत्रके तयार करताना अवलंबलेली अंतर्गत नियंत्रण पद्धती विचारात घेतात. लेखापरिक्षणामध्ये, व्यवस्थापनाने वापरलेल्या अकौटींग तत्वाच्या योग्यतेचे मुल्यमापन करणे, व्यवस्थापनाने केलेल्या महत्वाच्या आर्थिक अंदाजाच्या योग्यतेचे मुल्यमापन करणे व आर्थिक पत्रकांच्या सादरीकरणाचे मुल्यमापन करणे याचा सुद्धा समावेश होतो.

५. आमचा विश्वास असा आहे की, आमच्या लेखापरिक्षणा दरम्यान आम्हाला मिळालेले पुरावे आम्हाला आमचे लेखापरिक्षणाबाबतचे मत बनविण्यासाठी यथार्थ आधार मिळवून देतात.

अभिमत

६. आमच्या मते आम्हाला दिलेल्या संपूर्ण माहिती तसेच खुलाशावरुन हे हिशोब, त्या सोबतची टिपण व त्यासोबत जोडलेली परिशिष्ठे आणि आमच्या लेखापरिक्षण अहवालातील मुद्दे यांना अनुसरुन महाराष्ट्र सहकारी संस्थाचा १९६० चा कायदा व त्या खालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहिती देतात तसेच भारतामध्ये सर्वमान्य असणाऱ्या अकौटींग तत्वांचे अनुपालन करतात आणि

अ. ताळेबंदच्या बाबतीत दि. ३१.०३.२०१७ च्या बँकेच्या आर्थिक परिस्थितीची आणि

ब. नफा/तोटा पत्रकाच्या बाबतीत या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या मुदतीत बँकेच्या नफ्याची सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहेत.

७. सदर बँकेचे ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रक हे बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ च्या कलम २९ तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या तरतुदीनां अनुसरुन तयार केले आहेत.

८. परिच्छेद क १ ते ५ मध्ये नमुद केलेल्या लेखापरिक्षण पद्धती आणि मुख्य व शाखा अहवालातील भाग अ, ब आणि क मध्ये नमुद केलेल्या शेऱ्यास अनुसरुन तसेच आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे आणि आम्हाला दिलेल्या संपूर्ण माहिती तसेच खुलाशावरुन आणि बँकेने सादर केलेल्या हिशोब व त्यासोबत जोडलेली परिशिष्ठ यांना अनुसरुन आम्ही अहवाल करतो की,

१. आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी, आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत व ते समाधानकारक आहेत.

२. आमच्या दृष्टीपतास आलेले बँकेचे व्यवहार हे बँकेच्या अधिकारक्षेत्रास आधिन राहून केलेले आहेत.

३ लेखापरिक्षणाच्या दृष्टीने शाखांकडून प्राप्त झालेली विवरणे पुरेशी आहेत.

९. आमच्या मते ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे अकौंटिंग स्टॅन्डर्डस्चे सर्व साधारणपणे योग्य रितीने अनुपालन करतात.

१०. तसेच आम्ही अहवाल करतो की,

१. आम्ही तपासलेला ताळेबंद व नफा/तोटा पत्रक संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकांशी व विवरणाशी जुळत आहेत.

२. आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल, त्यावरुन संस्थेने संबंधीत कायद्यानुसार अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबांची पुस्तके ठेवलेली आहेत.

३. लेखापरिक्षण अहवाल तयार करताना आम्ही लेखापरिक्षण केलेल्या शाखाच्या अहवालांचा परामर्ष घेतला आहे.

**४. आर्थिक वर्ष २०१६-१०१७ करिता संस्थेस वर्ग "अ" देण्यात आलेला आहे.**

करमरकर नाईक ॲण्ड असोसिएटस्
चार्टर्ड अकौटंटस्,करिता

स्थळ : चिपळूण
दिनांक : १०.०७.२०१७

सी ए सुमेध करमरकर
भागिदार




आता माण देशी बँकेमध्ये मोबाईल ॲप्लीकेशनद्वारे टेक्नोस्पायर टेक्नॉलॉजीस् च्या Mobile Bank collection System(BCS) ची सुविधा सुरु करण्यात आली. आपण हे ॲप ॲण्ड्रॉईड मोबाईलमध्ये घेऊन ते माण देशी बँकेमधून ॲक्टिवेट करुन दैनंदिन collection किंवा वेगवेगळ्या बचत खात्यामध्ये Online अथवा offline या दोन्ही मोडमध्ये काम करु शकता व पैसे जमा करु शकता. तसेच बिझनेस करस्पोडंटस् हे ॲप अगदी सहज हाताळू शकतात. यामध्ये आपण बचत खात्यांमध्ये बँकेच्या अधिकृत BCA (Business correspondent Agent) द्वारे पैसे भरु शकता.

एस एम एस सुविधा– पैशाचा व्यवहार झाल्यानंतर बँकेच्या ग्राहकांना त्यांच्या खात्याला नोंद असलेल्या मोबाईल नंबर वरती त्वरीत SMS जातो व छोट्या वायरलेस Thermal printer द्वारे पैसे जमा केलेल्याची पावती देखील भेटते.

## माण देशी महिला सह. बँक लि. म्हसवड ता. माण
### बँकेची प्रगती

| अ. क्र. | तपशील | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ | २०१६ | २०१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सभासद संख्या | ११३६६ | ११८७१ | १२२२० | १४०५३ | १७१७३ | २२७०१ | २५८३२ | २४९७८ |
| | | | | | | | | | ₹ लाखात |
| १ | भागभांडवल | २२३.४२ | २६०.०६ | २७६.५३ | ३०८.८१ | ३८४.६७ | ४७०.०० | ५१७.३७ | ५४३.७० |
| २ | एकूण ठेवी | २७२१.५६ | ३३३८.२५ | ४०००.०० | ४८०१.१९ | ६३९८.०० | ७६३३.२९ | ८७८२.०७ | ८९४२.०० |
| ३ | एकूण कर्जवाटप | १४४२.१४ | २२४०.९९ | २६४१.८३ | २८५३.५९ | ३९५०.३७ | ५३१८.४८ | ५१९९.५२ | ५६८५.९३ |
| ४ | गुंतवणूक | १०२९.९३ | ८३९.६१ | १२९१.३३ | १७८७.३५ | २२९२.३९ | २२४१.४७ | ३४४०.७३ | ३०१०.९४ |
| ५ | खेळते भांडवल | ३०८४.५३ | ३७३३.१५ | ४४९१.३१ | ५३७०.५३ | ७१५१.१४ | ८६३०.८७ | ९८७२.९७ | १०१७०.२१ |

## परिशिष्ट 'अ'

| | |
|---|---|
| १) बँकेचे नांव | :- माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड |
| २) मुख्य कार्यालयाचा पत्ता | :- मु. पो. म्हसवड ता. माण जि. सातारा पिन नं. ४१५५०९ |
| ३) नोंदणी क्रमांक व तारीख | :- एस. ए. टी. (माण)/बी.एन.के.(ओ)/११९/सन १९९६ दि. ३१/१०/१९९६ |
| ४) रिझर्व बँक परवाना क्रमांक व तारीख | :- एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१ पी ,२७/१/१९९७ |
| ५) कार्यक्षेत्र | :- सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, रायगड, पुणे,कोल्हापूर जिल्हे |

## दि. ३१/०३/२०१७ रोजीची आर्थिक स्थिती

(रक्कम ₹ लाखात )

| | | |
|---|---|---|
| शाखा-मुख्यालय | | ७ |
| सभासद | १. अ वर्ग | २४९७८ |
| | २. ब वर्ग | ४४८८ |
| वसुल भागभांडवल | | ₹ ५४३.७० |
| राखीव व इतर निधी | | ₹ ३७५.८० |
| ठेवी (₹८९४२.००) | अ) बचत ठेव | ₹११९४.२७ |
| | ब) चालू ठेव | ₹ ३५२.६७ |
| | क) मुदत ठेवी | ₹ ७३९५.०६ |
| कर्जे( ₹५६८५.९३) | अ) तारणी | ₹ ४०८२.५३ |
| | ब) बिनातारणी | ₹ १६०३.४० |
| | क) अग्रक्रम क्षेत्र कर्जपुरवठा टक्केवारी | ९१.१९% |
| | ड) दुर्बल घटक कर्जपुरवठा टक्केवारी | ८७.३८% |
| बाहेरील कर्जे | | ₹ ०.०० |
| गुंतवणूक (₹ ३०१०.९४) | सातारा डी.सी.सी.बँक लि. | ₹ ११९.४९ |
| | शासकीय मान्यताप्राप्त रोखे | ₹ २२९६.५८ |
| | इतर | ₹ ५९४.८७ |
| थकबाकीचे येणे कर्जाशी शेकडा प्रमाण | | ३.०८% |
| ऑडीटवर्ग | | 'अ' |
| नफा | | ₹ ५६.५१ |
| एकूण कर्मचारी | | ६८ |
| खेळते भांडवल | | ₹१०१७०.२१ |

रिझर्व्ह बँक परिपत्रक क्र. ५२ दि. २५.०३.२०१४ नुसार बँकांनी ताळेबंद सोबत द्यावी लागणारी माहिती

(रक्कम ₹ लाखात)

| अ. नं. | तपशील | ३१/०३/१६ | ३१/०३/१७ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| १ | **भांडवल पर्याप्तता (शेकडा प्रमाण)** | १७.००% | १५.४६% | -१.५४% |
| २ | **भांडवल निधी तपशील** | | | |
| | टायर- १ निधी | ७६६.३० | ८२५.७४ | ५९.४४ |
| | टायर -२ निधी | २५.२४ | ४०.२९ | १५.०५ |
| | **एकूण निधी** | ७९१.५४ | ८६६.०३ | ७४.४९ |
| | एकूण जोखीम मालमत्ता | ४६५५.५७ | ५६०१.५१ | ९४५.९४ |
| ३ | **भांडवल निधीचे जोखीम मालमत्तेशी प्रमाण** | | | |
| | टायर- १ निधी | १६.४६% | १४.७४% | -१.७२% |
| | टायर -२ निधी | ०.५४% | ०.७२% | ०.१८% |
| | **एकूण निधी** | १७.००% | १५.४६% | -१.५४% |
| | गुंतवणूक व त्यांचे मुल्यांकन | | | |
| ४ | **अ. एस.एल.आर गुंतवणूक** | | | |
| | १. सरकारी कर्जरोखे | २१७१.१३ | २२९६.५८ | १२५.४५ |
| | **एकूण** | २१७१.१३ | २२९६.५८ | १२५.४५ |
| | **ब. बँक व इतर गुंतवणूक** | | | |
| | १. राष्ट्रीयकृत खाजगी व सहकारी बँकांतील ठेवी | ९४२.०० | ६२१.६६ | -३२०.३४ |
| | २. डी.सी.सी.बँक ठेव | ३२७.५५ | ९२.६५ | -२३४.९० |
| | | १२६९.५५ | ७१४.३१ | -५५५.२४ |
| | **क. शेअर्समधील गुंतवणूक** (एम.एस.सी.बँक,डी.सी.सी.बँक, बँक असो.) | ०.०५ | ०.०५ | ००.० |
| | **एकूण (अ+ब+क)** | ३४४०.७३ | ३०१०.९४ | -४२९.७९ |
| | **ड. मुल्यांकन** | | | |
| | १. दर्शनी किंमत | २२०१.१० | २३४२.०० | १४०.९० |
| | २. पुस्तकी किंमत | २१७१.१३ | २२९६.५८ | १२५.४५ |
| | ३. बाजारभावाने होणारी किंमत | २१८१.९७ | २३०२.५७ | १२०.६० |

| अ. नं. | तपशील | ३१/०३/१६ | ३१/०३/१७ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| | **ई. उत्पादनक्षमता नसलेली गुंतवणूक तपशील** | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ५ | **घरकुल, बांधकाम, व्यवसाय यासाठी दिलेल्या कर्जाचा तपशील** | | | |
| | १. बांधकाम व्यवसायिक यांना दिलेले कर्ज | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २. घरकुल व दुरुस्तीअंतर्गत दिलेले कर्ज | ३२६.४१ | ४६१.१३ | १३४.७२ |
| | **एकूण** | **३२६.४१** | **४६१.१३** | **१३४.७२** |
| ६ | **शेअर्स व डिबेंचरर्स तारणावर दिलेली कर्जे** | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ७ | **संचालक नातेवाईक यांना दिलेली कर्जे** | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | फंडबेस कर्जाचा तपशील | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | नॉन फंडबेस कर्जाचा तपशील | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ८ | **ठेवीचा सरासरी व्याजदर** | ८.७८% | ८.८७% | ०.०९ |
| ९ | **एन.पी.ए. चा तपशील** | | | |
| | अ. ढोबळ एन.पी.ए. शेकडा प्रमाण | २.१७% | ४.११% | २.०६% |
| | ब. निव्वळ एन.पी.ए. शेकडा प्रमाण | ०.५२% | २.३३% | १.९२% |
| १० | **एन.पी.ए. मुव्हमेंट** | | | |
| | आरंभीची एन.पी.ए. रक्कम | १११.०४ | ११२.७६ | १.७२ |
| | + चालु वर्षातील एन.पी.ए. खाती | ६२.०७ | २०३.२४ | १४१.१७ |
| | - चालु वर्षातील वसुलीची रक्कम | ६०.३५ | ८२.०५ | २१.७० |
| | शिल्लक एन.पी.ए. रक्कम | **११२.७६** | **२३३.९५** | **१२१.१९** |
| ११ | **एन.पी.ए. वर्गीकरणानुसार वसुलीचा तपशील** | | | |
| | सब स्टॅन्डर्ड | ३४.३० | ६०.३१ | २६.०१ |
| | डाऊटफुल एक वर्षापर्यंत | ९.४४ | ६.०६ | -३.३८ |
| | डाऊटफुल एक ते दोन वर्षापर्यंत | २.४५ | १४.४१ | ११.९६ |
| | डाऊटफुल तीन वर्षापर्यंत | १४.१६ | १.२७ | -१२.८९ |
| | एकूण एन.पी.ए. | **६०.३५** | **८२.०५** | **२१.७०** |

| अ. नं. | तपशील | ३१/०३/१६ | ३१/०३/१७ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| १२ | **एन.पी.ए. तरतूदीमधील चढउतार** | | | |
| | आरंभीची तरतूद | ८६.०१ | ८६.०१ | ०.०० |
| | + चालु वर्षातील तरतूद | ०.०० | १८.०० | १८.०० |
| | एकूण तरतूद | ८६.०१ | १०४.०१ | १८.०० |
| १३ | **स्टॅन्डर्ड ॲसेट तरतूदीमधील चढउतार** | | | |
| | आरंभीची तरतूद | १३.१० | १३.१० | ०.०० |
| | + चालु वर्षातील तरतूद | ०.०० | १०.६० | १०.६० |
| | एकूण तरतूद | १३.१० | २३.७० | १०.६० |
| १४ | **नॉन परफॉर्मींग गुंतवणूकीपोटी केलेल्या तरतूदीमधील चढउतार** | | | |
| | आरंभची तरतूद | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | + चालु वर्षातील तरतूद | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण तरतूद | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १५ | **गुंतवणूक चढउतार निधी** | | | |
| | आरंभीची तरतूद | ६.७६ | ९.३९ | २.६३ |
| | + चालु वर्षातील तरतूद | २.६३ | ४.४५ | १.८२ |
| | एकूण तरतूद | ९.३९ | १३.८४ | ४.४५ |
| १६ | **गुंतवणूक,घसारा निधीमधील चढउतार** | | | |
| | आरंभीची तरतूद | २.१५ | २.१५ | ०.०० |
| | + चालु वर्षातील तरतूद | ०.०० | -२.१५ | -२.१५ |
| | एकूण तरतूद | २.१५ | ०.०० | -२.१५ |
| १७ | **खेळत्या भांडवलाशी** | | | |
| | १. मिळालेल्या व्याजाचे शेकडा प्रमाण | ११.५८% | १०.५४% | -१.०४% |
| | २. इतर उत्पनाचे शेकडा प्रमाण | ०.२६% | ०.८५% | ०.५९% |
| | ३. ढोबळ नफ्याचे शेकडा प्रमाण | ०.६२% | ०.७९% | ०.१७% |

| अ. नं. | तपशील | ३१/०३/१६ | ३१/०३/१७ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| | ४. निव्वळ नफ्याचे शेकडा प्रमाण | ०.४३% | ०.५६% | ०.१३% |
| | ५. व्यवस्थापकीय खर्चाचे शेकडा प्रमाण | ३.४०% | ३.६३% | ०.२३% |
| | ६. प्रती सेवक व्यवसाय | २१५.१० | २१५.१२ | ०.०२ |
| | ७. प्रती सेवक नफा | ०.६४ | ०.८३ | ०.१९ |
| १८ | **परकीय चलनामधील व्यवहाराची माहीती** | लागू नाही | | |
| १९ | **रिझर्व्ह बँकेने पेनल्टी आकारली असल्यास त्याचा तपशील** | लागू नाही | | |
| २० | **रिस्ट्रक्चर केलेल्या कर्ज खात्यांचा तपशील** | घरकुल कर्जे | एस.एम.ई.कर्जे | इतर कर्जे |
| | अ. स्टॅन्डर्ड रिस्ट्रक्चर केलेली कर्जे | | | |
| | १. खातेसंख्या | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २. रक्कम | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | ३. तारण मुल्यातील घट | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | ब. सबस्टॅन्डर्ड रिस्ट्रक्चर केलेली कर्जे | | | |
| | १. खातेसंख्या | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २. रक्कम | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | ३. तारण मुल्यातील घट | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | क. डॉऊटफुल रिस्ट्रक्चर केलेली कर्जे | | | |
| | १. खातेसंख्या | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २. रक्कम | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | ३. तारण मुल्यातील घट | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण (अ+ ब + क) | | | |
| | १. खातेसंख्या | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २. रक्कम | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | ३. तारण मुल्यातील घट | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २१ | **बँकेच्या स्थावर मालमत्तेचे पुनर्मुल्यांकन केले असल्यास त्याचा तपशील** | लागू नाही | | |

## 22.i) Composition of National & Co-operative Investment

| Sr. No | Issuer | Amount | Extent of below Investment grade Securities | Extent of unrated Securities | Extent of unlisted Securities |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | PSUs | -- | -- | -- | -- |
| 2 | FIs | -- | -- | -- | -- |
| 3 | Public Sector Banks<br>1) State Bank Of India | 336.97 | | | |
| | 2) Bank of Maharashtra | 30.00 | | | |
| | Total | 366.97 | | | |
| 4 | Mutual Funds | 225.00 | -- | -- | -- |
| 5 | Others | | | | |
| | 1. DCC Reserve Fund | 26.84 | | | |
| | 2. Karad Urban Co-op. Bank | 2.85 | | | |
| | Total | 29.69 | | | |
| 6 | Provision held towards depreciation | -- | -- | -- | -- |

## ii) Non - performing Non- SLR Investment

| Particulars | Amount (₹ in Crore) |
|---|---|
| Opening Balance | ---- |
| Addition during the year since 1st April | ---- |
| Reductions during the above period | ---- |
| Closing Balance | ---- |
| Total Provisions Held | ---- |

२३) ठेव विमा प्रिमियम तपशील:-

(रक्कम ₹ लाखात)

| ठेव कालावधी | रक्कम अदा तारीख | ठेव विमा प्रिमीयम रक्कम |
|---|---|---|
| ०१.०४.२०१६ ते ३०.०९.२०१६ | ४.०५.२०१६ | ५.१३ |
| ०१.१०.२०१६ ते ३१.०३.२०१७ | २६.१०.२०१६ | ४.४२ |

## मा. संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाचा तपशील
## सन २०१६-२०१७
## महाराष्ट्र सहकार कायदा कलम ७५ (२) प्रमाणे-

| तपशील | वर्ष आरंभी येणे रक्कम | आर्थिक वर्षात कर्जाऊ दिलेली रक्कम | आर्थिक वर्षात जमा झालेली रक्कम | वर्षा-अखेरची येणे बाकी | कॉलम ५ पैकी थकीत कर्ज |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| फंड बेस्ड | | | | | |
| नॉन फंड बेस्ड | | निरंक | | | |
| एकूण | | | | | |

मुख्य कार्यकारी अधिकारी
माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड

## ताळेबंद पत्रक

## 'एन' नमुना

| रक्कम ३१।०३।२०१६ | भांडवल व देणी | रक्कम ३१।०३।२०१७ | रक्कम ३१।०३।२०१७ |
|---|---|---|---|
| ७००००००००.०० | अधिकृत भागभांडवल | | ७००००००००.०० |
| | १०० चे ७०००००० भाग या प्रमाणे भाग | | |
| ५१७३६५५०.०० | १) वसुल भागभांडवल | ५४३६९७५०.०० | ५४३६९७५०.०० |
| | व्यक्तिगत | | |
| ३२७१४४६३.७५ | २) इतर निधी व तरतूदी | | ३७५७९८७०.३९ |
| | राखीव निधी | १२६७९९१५.१२ | |
| | इमारत निधी | ९८७४०१२.२० | |
| | लाभांश स. निधी | १५६८५.०० | |
| | संशयित बुडीत कर्ज निधी तरतूद | १०४००५१४.३८ | |
| | गुंतवणूक चढउतार निधी | १३८४२३०.०० | |
| | गुंतवणूक घसारा निधी | ०.०० | |
| | स्टँडर्ड असेट तरतूद | २३६९५००.०० | |
| | तांत्रिक विकास निधी | ८४६२५.०० | |
| | सभासद प्रशिक्षण निधी | १७५०००.०० | |
| | निवडणुक निधी | ५९६३८८.६९ | |
| ०.०० | ३) बाहेरील कर्जे | | ०.०० |
| ८७८२०६५२९.१७ | ४) ठेवी | | ८९४१९९५९८.०५ |
| | अ) व्यक्तिगत ठेवी | | |
| | १) व्यक्तिगत मुदत ठेवी (मुदत संपलेल्या ठेवी-१२०४२२३) | ५२९३३१८७६.०० | |
| | २) संस्था ठेवी | २१०१७४३८६.०० | |
| | ब) सेव्हिंग्ज ठेव | | |
| | १) व्यक्तिगत सेव्हिंग्ज ठेव | ११९३८८३६२.२३ | |
| | २) संस्था सेव्हिंग्ज ठेव | ३८३०१.०३ | |
| | क) चालु ठेव | | |
| | १) व्यक्तीगत चालु ठेव | ५११९५९२.१२ | |
| | २) संस्था चालु ठेव | ३०१४७०८०.६७ | |
| | ५) ओ.बी.सी.(नावे बाजुप्रमाणे) | २५००.०० | २५००.०० |

## दि. ३१।०३।२०१७ अखेर

| रक्कम ३१।०३।२०१६ | जिंदगी व येणी | रक्कम ३१।०३।२०१७ | रक्कम ३१।०३।२०१७ |
|---|---|---|---|
| ४५७३९५७१.०० | १. हातावरील शिल्लक | | ४०५२०६७४.०० |
| ५२२३४०७५.७० | २. बँकेतील शिल्लक | | ७५८४९९०७.७३ |
| | १) एम.एस.सी. आणि डी.सी.सी.बँक चालु ठेव खाते | १८३६०१७५.२३ | |
| | २) राष्ट्रीयकृत बँक चालू ठेव खाते | ३२८००२६३.०८ | |
| | ३) व्यापारी बँक चालू ठेव खाते | २३८६४७३५.४३ | |
| | ४) सहकारी बँक चालू ठेव खाते | ८२४७३३.९९ | |
| ३४४०७२८४९.०० | ३. गुंतवणूक | | |
| २१७११२६५६.०० | अ) सरकारी रोखे | | २२९६५८२८६.०० |
| | १) केंद्र सरकारी रोखे (Face Value Rs.21,87,00,000) | २१४१३८४१२.०० | |
| | २) राज्य सरकारी रोखे (राखीव निधीसाठी) | १५५१९८७४.०० | |
| १२६९५५१९३.०० | ब) बँकेतील मुदत ठेवी | | ३८१६५८७४.०० |
| | १) एम.एस.सी.आणि डी.सी.सी.बँक मुदत ठेव खाते | ११९४८७५४.०० | |
| | २) राष्ट्रीयकृत बँक मुदत ठेव खाते | २५९३१८०७.०० | |
| | ३) शेड्युल सहकारी बँक मुदत ठेव खाते | २८५३१३.०० | |
| ०.०० | ४. मल्टीऑप्शनल ठेव | | |
| | एस.बी.आय.मल्टीऑशनल ठेव | १०७६५०००.०० | १०७६५०००.०० |
| ५०००.०० | नॉन एस.एल.आर गुंतवणूक | | २२५०५०००.०० |
| | १) जि.मध्य.सह बँक शेअर्स | ५०००.०० | |
| | २) म्युचुअल फंड गुंतवणूक | २२५००००००.०० | |
| ५१९९५२०२३.६८ | ५. कर्जे | | ५६८५९३२५०.०३ |
| | अ) अल्प मुदत कर्जे | | |
| | १) तारणी कर्जे | ११७४५४८१२.०० | |
| | २) विनातारणी कर्जे | १४४५१७९३६.५८ | |
| | ब) मध्यम मुदत कर्जे | | |
| | १) तारणी कर्जे | ५९४१६२९७.४२ | |
| | २) विनातारणी कर्जे | १५८२२४९८.०० | |
| | क) दिर्घ मुदत कर्जे | | |
| | १) तारणी कर्जे | २३१३८१७०६.०३ | |

## 'एन' नमुना

## ताळेबंद पत्रक

| रक्कम ३१।०३।२०१६ | भांडवल व देणी | रक्कम ३१।०३।२०१७ | रक्कम ३१।०३।२०१७ |
|---|---|---|---|
| ४५५१४२३.०० | ६) थकव्याज तरतूद | | ५८१५२३३.०० |
| | १) एन.पी.ए. थकव्याज | ५८१५२३३.०० | |
| १८७५६१२१.०० | ७) देणे व्याज | | १९६९३८५०.०० |
| | १) ठेवीवरील देणे व्याज | १९६९३८५०.०० | |
| १६९८४६८.०० | ८) इतर देणी व तरतूदी | | ४१५७७७९.०० |
| | १) ऑडिट फी देणे | ७०००००.०० | |
| | २) टी.डी. एस. देणे | २२८४३६.०० | |
| | ३) आयकर देणे | ०.०० | |
| | ४) सरचार्ज देणे | ५२८५५.०० | |
| | ५) अनामत देणे | ११८३००.०० | |
| | ६) पे आर्डर देणे | ०.०० | |
| | ७) कर्मचारी देणे बोनस | १००००००.०० | |
| | ८) कर्मचारी ग्रॅच्युटी देणे | १३२५०००.०० | |
| | ९) लाईट बिल देणे | ४२४८८.०० | |
| | १०) लाभांश देणे | ६३७२८१.०० | |
| | ११) बिल देणे तरतूद | ५३४१९.०० | |
| ०.०० | ९) शाखा मिळवणी | १३६९३७५.३६ | १३६९३७५.३६ |
| ४१८५३७०.६४ | १०) नफा | | ५६५११९३.९६ |
| | १) मागील वर्षाचा शिल्लक नफा | ०.०० | |
| | २) नफा/तोटा खातेप्रमाणे | | |
| | आयकर पुर्व नफा | ८०६३६५३.९६ | |
| | वजा:- आयकर | २४१२४६०.०० | |
| | चालु वर्षाचा निव्वळ नफा | ५६५११९३.९६ | |
| ९११९२७४२५.५६ | एकूण | १०२२८३९१४९.७६ | १०२२८३९१४९.७६ |

लेखापरिक्षण अहवालातील शेऱ्यासपात्र राहून बरोबर आहे.

**शासकीय लेखापरिक्षक**
करमरकर नाईक ॲण्ड असोसिएटस्
चार्टर्ड अकौटंटस्, चिपळूण

# दि. ३१।०३।२०१७ अखेर

| रक्कम ३१।०३।२०१६ | जिंदगी व येणी | रक्कम ३१।०३।२०१७ | रक्कम ३१।०३।२०१७ |
|---|---|---|---|
| ४००४१७२.०० | ६. येणे व्याज | | ४५३४८९३.०० |
| | १) सरकारी रोख्यावरील | ४३९८५१८.०० | |
| | २) बँक मुदत ठेवीवरील | १३६३७५.०० | |
| ७८५००.०० | ७. ओ.बी.आर.(जमा बाजुप्रमाणे) | | २५००.०० |
| ४५५१४२३.०० | एन.पी.ए.वरील येणे व्याज(जमा बाजुप्रमाणे) | | ५८१५२३३.०० |
| ८६१७०.१८ | ८. शाखा मिळवणी | | ०.०० |
| ११९५९०५४.०० | ९. स्थावर व जंगम मालमत्ता | | ११०९२६६९.०० |
| | १) फर्निचर व फिक्चर डेडस्टॉक | ५११०८०८.०० | |
| | २) इलेक्ट्रीक डेडस्टॉक | २३६२५२९.०० | |
| | ३) कॉम्प्युटर हार्ड व सॉफ्टवेअर डेडस्टॉक | २२७८३९६.०० | |
| | ४) लॉकर डेडस्टॉक | १०३९३९२.०० | |
| | ५) मोटरसायकल डेडस्टॉक | ३०१५४४.०० | |
| ९२४९५८७.०० | १०. इतर मालमत्ता व येणे | | १५३३५८६३.०० |
| | १) टेलिफोन डिपॉझिट | २०११५.०० | |
| | २) इलेक्ट्रीक डिपॉझिट | १९५३५.०० | |
| | ३) नळ कनेक्शन डिपॉझिट | ७५०.०० | |
| | ४) शिल्लक स्टेशनरी | ३३१७६३.०० | |
| | ५) एम.एस.इ.बी. बिल कलेक्शन (डिपॉझिट) | १३०००००.०० | |
| | ६) ॲडव्हान्स डेडस्टॉक(WIP) | १०२१४२०४.०० | |
| | ७) ॲडव्हान्स | २२१२००.०० | |
| | ८) आयकर | २६८८५४०.०० | |
| | ९) पॅनकार्ड कुपन्स येणे | ११६४४८.०० | |
| | १०) टी.डी.एस. येणे | २१८६८२.०० | |
| | ११) एम.एस.ई. बी. कमिशन येणे रक्कम | २०४६२६.०० | |
| | १२) Incidential चार्जेस येणे | ०.०० | |
| ९९१९२७४२५.५६ | एकूण | १०२२८३९१४९.७६ | १०२२८३९१४९.७६ |

| सौ. रेखा सु. कुलकर्णी | सौ. ललिता सा. पोळ | श्रीमती चेतना सिन्हा |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्षा व सर्व संचालक मंडळ | अध्यक्षा |

## 'एन' नमुना

## नफा-तोटा पत्रक

| रक्कम ३१।०३।२०१६ | खर्च | रक्कम ३१।०३।२०१७ | रक्कम ३१।०३।२०१७ |
|---|---|---|---|
| ७७८८३०७०.९८ | १) व्याज दिले | | ६७९७३८६५.५६ |
| | व्याज दिले ठेवीवरील | ६७९७३४०३.५६ | |
| | व्याज दिले बँक ओ.डी. वरील | ४६२.०० | |
| १६८५३०१६.५० | २) पगार व कर्मचारी भत्ता | | १८८८१११४.२० |
| | कर्मचारी पगार | १५९४६७९४.०० | |
| | कर्मचारी भत्ता | ३२२०१.०० | |
| | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी | ३१२५१७.०० | |
| | भविष्य निर्वाह निधी प्रशासकीय खर्च | ३८३७६.०० | |
| | कर्मचारी प्रवास भत्ता | ०.०० | |
| | कर्मचारी बोनस | १००००००.०० | |
| | कर्मचारी विमा | १६६४२१.२० | |
| | कर्मचारी प्रशिक्षण | ५९८०५.०० | |
| | कर्मचारी ग्रॅच्युटी | १३२५०००.०० | |
| १००६६६.०० | ३) संचालक मिंटींग खर्च | | १०१८०२.०० |
| | संचालक मिंटींग भत्ता | ९२५००.०० | |
| | संचालक प्रवास भत्ता | ९३०२.०० | |
| ३१५२६४५.०० | ४) कर,भाडे,विमा | | ३१९३४५३.०६ |
| | ऑफिस भाडे | १५२८८००.०० | |
| | ऑफिस घरपट्टी व पाणीपट्टी | २०५६४.०० | |
| | विमा खर्च, डी.आय.सी.जी.सी. | १०७४५६१.०० | |
| | लाईट बिल खर्च | ५०३७४१.०० | |
| | वाहन कर | ४६७७५.०० | |
| | इलेक्ट्रीक खर्च | १९०१२.०६ | |
| ११६०००.०० | ५) कायदेशीर खर्च | | २५००००.०० |
| ५१३३६६.०० | ६) टेलिफोन व पोस्टेज खर्च | | ५६६५९७.०० |
| | पोस्टेज खर्च | १४४३३.०० | |
| | टेलिफोन खर्च आणि ब्रॉड बॅन्ड खर्च | ५५२१६४.०० | |
| ४७२७१४.०० | ७) ऑडीट फी व खर्च | | ९४०२०८.०० |
| २७२९२४३.४३ | ८) डेडस्टॉक दुरुस्ती व घसारा | | २४७९०१६.८१ |
| | घसारा खर्च | २२६१०६०.०० | |
| | डेडस्टॉक दुरुस्ती खर्च | ११४९९.०० | |
| | कॉम्प्युटर दुरुस्ती खर्च | ८०८७९.०० | |
| | सजावट खर्च | ०.०० | |
| | हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर खर्च | १२५५७८.८१ | |

दि. ०१।०४।२०१६ ते ३१।०३।२०१७ अखेर

| रक्कम ३१।०३।२०१६ | उत्पन्न | रक्कम ३१।०३।२०१७ | रक्कम ३१।०३।२०१७ |
|---|---|---|---|
| ११४२८८५३०.४७ | १) व्याज आले | | १०७१६८९६२.१७ |
| | १) व्याज आले कर्जावरील | ८६४४१०२६.२८ | |
| | २) व्याज आले सरकारी रोख्यावरील | १६१३०००६.८९ | |
| | ३) व्याज आले गुंतवणूकीवरील | ४५९७९२९.०० | |
| २५८१२७.०० | २) कमिशन आले | | ४२३१५५.०० |
| ४७४९८१.३२ | ३) इतर उत्पन्न | | ५४१०६३.६७ |
| १८३०९२८.०० | ४) सरकारी रोख्यावरील उत्पन्न | | ६९७२९६९.०० |
| ७१३२५०.०० | ५) सभासद फी उत्पन्न | | ७४८८३०.०० |

## 'एन' नमुना

## नफा-तोटा पत्रक

| रक्कम ३१।०३।२०१६ | खर्च | रक्कम ३१।०३।२०१७ | रक्कम ३१।०३।२०१७ |
|---|---|---|---|
| ३८९२७५.०० | ९) प्रिंटीग,स्टेशनरी व जाहीरात खर्च | | २२५६२३.०० |
| | स्टेशनरी खर्च | ७२०९३.०० | |
| | कॉम्प्युटर स्टेशनरी खर्च | ८१४९०.०० | |
| | जाहिराती खर्च | ७२०४०.०० | |
| ९२६५७०९.२४ | १०) इतर खर्च | | १०३१९६४६.२५ |
| | पिग्मी कमिशन | ८१२६७८९.५५ | |
| | सल्लागार फी | २५९१७२.०० | |
| | प्रवास खर्च | ३०३८६३.०० | |
| | वार्षिक मिटींग खर्च | १३०३००.०० | |
| | बँक सर्व्हिस चार्जेस | १०५३९८.३८ | |
| | आदरातिथ्य खर्च | ६७८३१.०० | |
| | सणसुद खर्च | ४०४८.०० | |
| | सरकारी रोखे अमॉर्टरायजेशन | ६४०८९.०० | |
| | निवडणुक खर्च | ४०२६६.०० | |
| | सॉफ्टवेअर खर्च | ९३१७९८.३२ | |
| | किरकोळ खर्च | ४२८६२.०० | |
| | वर्गणी खर्च | ५७०२०.०० | |
| | लॉकर भाडे | ११५०.०० | |
| | फ्रँकिंग चार्जेस | ६००.०० | |
| | ध्वज निधी खर्च | ०.०० | |
| | ए.टी.एम.NPCI चार्जेस | ६६३२२.०० | |
| | वसुली खर्च | ०.०० | |
| | टी.डी.एस. खर्च | ५३४.०० | |
| | सर्व्हीस टॅक्स खर्च | ११७६०३.०० | |
| ०.०० | ११) इतर तरतूद | | २८६००००.०० |
| | संशयित बुडीत कर्ज निधी तरतूद | १८०००००.०० | |
| | स्टँडर्ड असेट तरतूद | १०६००००.०० | |
| १९०४७४०.०० | १२) इन्कम टॅक्स | २४१२४६०.०० | २४१२४६०.०० |
| ४१८५३७०.६४ | १३) आयकर नंतरचा निव्वळ नफा | ५६५११९३.९६ | ५६५११९३.९६ |
| ११७५६५८१६.७९ | एकूण | ११५८५४९७९.८४ | ११५८५४९७९.८४ |

लेखापरिक्षण अहवालातील शेऱ्यासपात्र राहून बरोबर आहे.

**शासकीय लेखापरिक्षक**

करमरकर नाईक ॲण्ड असोसिएटस्

चार्टर्ड अकौटंटस्, चिपळूण

दि. ०१।०४।२०१६ ते ३१।०३।२०१७ अखेर

| रक्कम ३१।०३।२०१६ | उत्पन्न | रक्कम ३१।०३।२०१७ | रक्कम ३१।०३।२०१७ |
|---|---|---|---|
| | | | |
| ११७५६५८१६.७९ | एकूण | ११५८५४९७९.८४ | ११५८५४९७९.८४ |

**सौ. रेखा सु. कुलकर्णी**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सौ. ललिता सा. पोळ**
उपाध्यक्षा

**श्रीमती चेतना सिन्हा**
अध्यक्षा

व सर्व संचालक मंडळ

## सन २०१७ - २०१८ चे

| खर्च | ३१/०३/२०१७ चा अंदाजे खर्च | ३१/०३/२०१७ चा प्रत्यक्ष खर्च | वाढ | घट | २०१७-२०१८ चा अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|---|
| व्याज दिले | | | | | |
| १) ठेवीवरील | ९०६३०९१३.०० | ६७९७३४०३.५६ | | २२६५७५०९.४४ | ७०४०००००.०० |
| २) बँक ओ.डी. वरील | २१००००.०० | ४६२.०० | | २०९५३८.०० | १०००००.०० |
| सेवक पगार,बोनसखर्च,सेवक विमा | १९२७००००.०० | १८८२१३०९.२० | | ४४८६९०.८० | १९५०००००.०० |
| छपाई,स्टेशनरी व जाहीरात खर्च | ८०००००.०० | २२५६२३.०० | | ५७४३७७.०० | १३०००००.०० |
| एजंट कमिशन | ९००००००.०० | ८१२६७८९.५५ | | ८७३२१०.४५ | १०००००००.०० |
| पोस्टेज व टेलीफोन खर्च | ६५००००.०० | ५६६५९७.०० | | ८३४०३.०० | ७०००००.०० |
| लाईट,ऑफिस भाडे,विमा व कर खर्च | ७५०००००.०० | ५६०५९१३.०६ | | १८९४०८६.९४ | ६५०००००.०० |
| संचालक मिटींग व प्रवास भत्ते | ३०००००.०० | १०१८०२.०० | | १९८१९८.०० | २०००००.०० |
| सेवक प्रशिक्षण खर्च | १५००००.०० | ५९८०५.०० | | ९०१९५.०० | १०००००.०० |
| वार्षिक अहवाल व सभा खर्च | २०००००.०० | १३०३००.०० | | ६९७००.०० | २५००००.०० |
| ऑडीट फी व ऑडीट खर्च | ५५००००.०० | ९४०२०८.०० | ३९०२०८.०० | | ११०००००.०० |
| घसारा व डेडस्टॉक दुरुस्ती खच | ३००००००.०० | ३४१०८१५.१३ | ४१०८१५.१३ | | ४००००००.०० |
| इतर तरतूदी | १५०००००.०० | २८६००००.०० | १३६००००.०० | | १५०००००.०० |
| इतर खर्च | २२०००००.०० | १३८०७५८.३८ | | ८१९२४१.६२ | ३००००००.०० |
| आयकर | ०.०० | ०.०० | | | २५२००००.०० |
| नफा | ६३७४३३९.०० | ५६५११९३.९६ | | ७२३१४५.०४ | ६३४८८६७.०० |
| एकूण | १४२३३५२५२.०० | ११५८५४९७९.८४ | २१६१०२३.१३ | २८६४१२९५.२९ | १२७५१८८६७.०० |

# अंदाज पत्रक

| उत्पन्न | ३१/०३/२०१७ चे अंदाजे उत्पन्न | ३१/०३/२०१७ चे प्रत्यक्ष उत्पन्न | वाढ | घट | २०१७-२०१८ चे अंदाजे उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| **व्याज आले** | | | | | |
| १) कर्जावरील | ११६४५१७१५.०० | ८६४४१०२६.२८ | | ३००१०६८८.७२ | ९२२३५०००.०० |
| २) गुंतवणूकीवरील | ४२१५३९१.०० | ४५९७९२९.०० | ३८२५३८.०० | | ६२७७२८१.०० |
| ३) सरकारी रोख्यावरील | १८४४२३३७.०० | १६१३०००६.८९ | | २३१२३३०.११ | १७२७५९३६.०० |
| लाभांश | ३०९.०० | ६५०.०० | ३४१.०० | | ६५०.०० |
| कमिशन | ३५००००.०० | ४२३१५५.०० | ७३१५५.०० | | ६३००००.०० |
| लॉकर भाडे | ६०५००.०० | ३३७१२.०० | | २६७८८.०० | ०.०० |
| इतर उत्पन्न | ४०००००.०० | १०७७६९८.०० | ६७७६९८.०० | | ८१०००००.०० |
| सर्व्हिस चार्जेस | ४०००००.०० | १७७५०९.०० | | २२२४९१.०० | ०.०० |
| सरकारी रोख्यावरील उत्पन्न | २००००००.०० | ६९७२९६९.०० | ४९७२९६९.०० | | ३००००००.०० |
| वसुली चार्जेस | १५०००.०० | ०.०० | | १५०००.०० | ०.०० |
| चेक बुक चार्जेस | ०.०० | ३२४.६७ | ३२४.६७ | | ०.०० |
| एकूण | १४२३३५२५२.०० | ११५८५४९७९.८४ | ६१०७०२५.६७ | ३२५८७२९७.८३ | १२७५१८८६७.०० |

## पोटनियम दुरुस्तीबाबतची(पुरवणी २ री)

| पोटनियम अनुक्रमांक | सध्याच्या पोटनियमाची शब्द योजना | दुरुस्त झाल्याप्रमाणे पोटनियमाची शब्द योजना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| 2 | **REGISTERED OFFICE:**<br>i) The Principal place and the Registered Office of the Bank shall be situated At & Post,Mhaswad,Taluka Mann, Dist.-Satara<br>ii) Any change in the address shall be published in local newspaper and shall be made by an amendment to its Bye-laws after follwing the procedures laid down in the MSC Act,1960 with prior approval from R.B.I. | **REGISTERED OFFICE:**<br>i) The Principal place and the Registered Office of the Bank shall be situated Mann Deshi Mahila Sahakari Bank Ltd. Mhaswad, Head Office, Shinganapur Chowk, City survey No. 2546B/2, 2546B/3, 2nd Floor, Satara Pandhapure Main Road, At/Post-Mhaswad, Tal. Man, District-Satara, Pin Code-415 509. | Due to inadequate previous available space for Banking business. It is dedided to Shift the Head and Branch office in Mhaswad Locality new address. |

## पोटनियम दुरुस्तीबाबतची(पुरवणी ८ वी)

| पोटनियम अनुक्रमांक | सध्याच्या पोटनियमाची शब्द योजना | दुरुस्त झाल्याप्रमाणे पोटनियमाची शब्द योजना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| 8 | **Authorized Share Capital:**<br>The authorized share capital of the Bank is Rs 7,00,00,000(Rs.Seven Crores Only)divided into 7,00,000 Shares of Rs. 100/- each which should be paid in full on application. | **Authorized Share Capital:**<br>The authorized share capital of the Bank is Rs. 10,00,00,000(Rs.Ten Crores Only)divided into 10,00,000 Shares of Rs. 100/- each which should be paid in full on application. | Due to increasing business of Bank and fulfill the condition of the shares Linking as per By Laws No.55 Increasing of capital adequacy ratio |

## पोटनियम दुरुस्तीबाबतची(पुरवणी ३८ वी)

| पोटनियम अनुक्रमांक | सध्याच्या पोटनियमाची शब्द योजना | दुरुस्त झाल्याप्रमाणे पोटनियमाची शब्द योजना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| 38 | <u>**MINUTES OF THE GENERAL BODY MEETING:**</u><br>Minutes of the proceeding of the General Body Meetings shall be entered in a minute book kept for the purpose within thirty days of the conclusion of every such meeting concerned and shall be seated and signed by the Chairman and Chief Executive Officer of the Bank. The minutes so signed, shall be an evidence of the correct proceedings of the meetings. | <u>**MINUTES OF THE GENERAL BODY MEETING:**</u><br>The minutes of the meeting of the Board of Directors,sub committees shall be recorded in the Minutes book, or prepared in Electronic format and the pages of same shall be duly numbered. The Minutes shall be signed by the Committees Chairman of the meeting & Chief Executive Officer of the Bank. | To maintain the record correct and easy for handling. |

## पोटनियम दुरुस्तीबाबतची(पुरवणी ५५ वी)

| पोटनियम अनुक्रमांक | सध्याच्या पोटनियमाची शब्द योजना | दुरुस्त झाल्याप्रमाणे पोटनियमाची शब्द योजना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| 55 | **Linking of Share Holding with Loan Limits:** | **Linking of Share Holding with Loan Limits:** | Master Circular-Prudential Norms on Capital Adequacy UCBs,RBI/2015-16/9 DCBR.BPD.(PCB).MC.No.10/ 09.18.201/2015-16July 1,2015 |
| | The shareholding of a member in the Bank shall be in the following proportion to its borrowings. | The shareholding of a member in the Bank shall be in the following properation to its borrowings. | |
| | a. 5% of the borrowings if such borrowings are unsecured basis. | a. 5% of the borrowings if such borrwoings are unsecured basis. | |
| | b. 2.5% of the borrowings in case of secured borrowings. | b. 2.5% of the borrowings in case of secured borrowings. | |
| | c. 2.5% of the borrowings in case of small scale industrial units,of which 1% to be collected initially and the balance 1.5% to be collected in the course of next 2 years. | c. 2.5% of the borrowings in case of small scale industrial units,of which 1% to be collected initially and the balance 1.5% to be collected in the course of next 2 years. | |
| | Provided that no member shall hold more than 1/5 th of the total share capital of the Bank. | **Provided that no member shall hold more than 5% of the total share capital of the Bank.** | |
| | Provided further that any change in the percentage of the share linking by the Reserve Bank of India shall be binding on the borrower. | Provided further that any change in the percentage of the share linking by the the Reserve Bank of India shall be binding on the borrower. | |
| | Provided further that if the capital adequacy ratio of the bank is more than 12% then the bank shall change the share linking percentage as per guidelines of Reserve Bank of India in case of secured loans. | Provided further that if the capital adequacy ratio of the bank is more than 12% then the bank shall change the share linking percentage as per guidelines of Reserve Bank of India in case of secured loans. | |

# माण देशी महिला सहकारी बँक व माण देशी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविलेले उपक्रम

## माण देशी उद्योगिनी व माण देशी चेंबर ऑफ कॉमर्स:-

''अतिशय दुर्गम भागात काम करुन देखील ग्रामीण महिला उद्योजक आपल्या व्यवसायाचा विस्तार करीत आहेत, त्यांच्याकडे कुठल्याही फॅन्सी डिग्रीज नसूनही त्यांची मुले-मुली एक दिवस लंडन व अमेरिकेत शिकायला येतील,'' ही बाब अभिमानास्पद व कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्‌गार ब्रिटनचे माजी पंतप्रधान मा. टोनी ब्लेअर यांच्या पत्नी व चेरी ब्लेअर फौंडेशन फॉर वुमेनच्या संस्थापिका श्रीमती चेरी ब्लेअर यांनी माण देशी फौंडेशनला भेट दिली त्या प्रसंगी काढले.

ग्रामीण महिलांमध्ये सुप्त गुण, कौशल्य दडलेले असतात, त्यांचा योग्यवेळी योग्य ठिकाणी वापर केला तर एक उत्तम उद्योजक निर्माण होवू शकतो. याची सांगड घालणेसाठी व महिलांची पैसा, व्यवसाय, मालमत्तेवर नियंत्रणशक्ती वाढावी या उद्‌देशाने गेली १० वर्षे माण देशी उद्योगिनी कार्यरत आहे. उद्योगिनी व चेंबर ऑफ कॉमर्स एकत्रितपणे महिलांना संपत्तीचे व्यवस्थापन, वित्तीय सेवांचा वापर व महत्वाचे व्यवसायिक ध्येय प्राप्त करण्यासाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन करीत आहे. याबरोबरच महिलांना नवीन मार्केटींग व नेटवर्कींगच्या संधी मिळवून व जोडून देत आहेत.

सध्या महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटकमध्ये माण देशी उद्योगिनी व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या ८ शाखा असून, फिरत्या व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या ६ शाखा आहेत. तसेच चेंबर ऑफ कॉमर्सच्या ३ शाखा आहेत. २४८७०३ महिलांनी व्यवसाय प्रशिक्षणाचा लाभ घेवून आपले व्यवसाय यशस्वी केले आहेत. महिलांच्या सोयीसाठी '' टोल फ्री '' नंबर १८०० २१२२ ११२ ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सन २०१६-१७ मध्ये माण देशी उद्योगिनी ने आपल्या कार्याचा विस्तार महाराष्ट्र राज्यामध्ये नाशिक, नवी मुंबई, दादरा-नगर हवेली, गुजरात येथे वाढविला आहे.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत अभ्यास केंद्र:-

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे ब्रीद '' ज्ञान गंगा घरोघरी '' हे लक्षात घेवून खऱ्या अर्थाने वंचितांसाठीचे शिक्षण माण तालुक्यात राबविण्याचे दृष्टीने माण देशी फौंडेशनने अतोनात प्रयत्न केले असून सन २०१६ -१७ मध्ये प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सेवा, सुविधा माण देशी फौंडेशन अभ्यासकेंद्राच्या माध्यमातून देण्यात आल्या आहेत.

माण देशी अभ्यास केंद्रातून पदवीधर होणाऱ्या सर्वच महिला विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी मार्गदर्शन व मदत करण्यात येत आहे. तसेच रोजगार संधी उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. त्यामुळे अभ्यासकेंद्रातील महिला प्रशिक्षणार्थींची संख्या वाढत आहे. गरीब विद्यार्थी सहाय्य निधी व स्कॉलरशिप शासन नियमानुसार मिळवून देण्यात येतात. त्याचा फायदा माण, आटपाडी, माळशिरस या तालुक्यातील विद्यार्थांनी घेतला आहे. तसेच २०१६-१७ मध्ये माण देशी अभ्यास केंद्रातून एकूण १६६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

## माण देशी चॅम्पियन क्रीडा संकुल म्हसवड:-

माण देशी फौंडेशन आयोजित '' माण देशी चॅम्पियन क्रीडा संकुल '' ची स्थापना १७ डिसेंबर २०१० साली झाली. माण देशी क्रीडा संकुलामध्ये ४०० मीटरचा ट्रॅक बनवलेला आहे.

दुष्काळी भागातील गरजू मुली व मुलांची शारिरीक,मानसिक, बौद्धिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी दूरदृष्टी ठेवून हे उचललेले एक पाऊल आहे, यामुळे या भागातील खेळाडूंना चांगला फायदा होत आहे. या मैदानावरील १५० खेळाडू राज्य / राष्ट्रीय पातळीवर गेलेले आहेत. विशेष कौतुकाची बाब म्हणजे हॉकी संघाची कु. सरिता भिसे ही महाराष्ट्र संघाचे कॅप्टन पद संभाळत आहे. तसेच कु. वैष्णवी सावंत ची फ्रान्स येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय स्कूल फेडरेशनमध्ये निवड झाली. माण देशी चॅम्पियन क्रीडा संकुलमध्ये उन्हाळी शिबीर, मिनी मॅरेथॉन, क्रीडा प्रबोधिनी कॅम्प, बेस बॉल,भोजलिंग ट्रॅकिंग, झेडपी शाळेच्या स्पर्धा, योगा अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. सहा वर्षाच्या कालावधीमध्ये जवळजवळ ४००० खेळाडुंनी माण देशी क्रीडा संकुलमध्ये सहभाग घेतला.

## माण देशी तरंग वाहिनी म्हसवड (कम्युनिटी रेडिओ केंद्र):-

माण देशी समुदायासाठी विशेषत: कार्यरत असणारे माण देशी तरंग वाहिनी कम्युनिटी रेडिओ केंद्र २०१७ साठी ९ व्या वर्षात पदार्पन करीत आहे. २०१७ हे वर्ष या रेडिओ केंद्रा मार्फत आवाजाची विविधता वर्ष म्हणून साजरे होत आहे. या वर्षी ही इंडिया फौंडेशन आणि आईडोसिंक मिडिया कंम्बाईन मार्फत फेलो रेडिओ कार्यक्रम निर्मिती मध्ये सहभागी होणार आहे. रिच अक्षय प्रोजेक्ट चेन्नई मार्फत १०० दिवसाचा टीबी जागरुकता कार्यक्रम माण देशी समुदयासाठी राबविण्यात येत आहे.

रेडिओ केंद्रामार्फत मासिक वार्ता दरमहा प्रसारित केले जात आहे. त्याची इंग्रजी भाषेतील आवृत्ती भारतामध्ये १५०० ठिकाणी पाठविण्यात येत आहे. सकाळच्या पहिल्या प्रसारण सभेत तसेच दुपारच्या महिला प्रसारण सभेत ''फोन इन'' कार्यक्रमाद्वारे लाईव्ह कार्यक्रम श्रोत्यांच्यासाठी सादर करण्यात येत आहे.

सन २०१६-१७ या वर्षात जवळजवळ २००० माण देशी महिला, नागरीक व शालेय विद्यार्थ्यांनी माण देशी तरंगवाहिनी मध्ये रेडिओ कार्यक्रमाचे ध्वनीमुद्रण केले. माण देशी तरंगवाहिनीला ३०० प्रसिद्ध मान्यवरांनी भेट देवून माण देशी रेडिओच्या कार्याचे कौतुक केले.

महिला लोक कलाकारांना मोठ्या प्रमाणात रेडिओ कार्यक्रमात सहभागी करुन घेण्यात येत आहे. २०१७ सालात प्रसार भारतीच्या मान्यतेने माण देशी रेडिओवरुन दररोज राष्ट्रीय हिंदी व मराठी बातमीचे पुर्नप्रक्षेपण करण्यात येते आहे.

**" रोज ऐका माण देशी रेडिओ फक्त तुमचा रेडिओ "**

**माण देशी बंधारा:-** "माणचा भाग म्हणजे पाण्याचे दुर्भिक्ष, नेहमीच दुष्काळ या भागाला निसर्गाची साथ नाही. कुठलीच मुलगी लग्न करुन माणला यायला तयार होत नव्हती कारण दररोज सकाळी उठून पाण्यासाठी ५ किमी पायपीट करावी लागायची. माण देशीने बांधलेल्या बंधाऱ्यामुळे भागाचा कायापालटच झाला" हे उद्‌गार आहेत माणच्या एका शेतकऱ्याचे. दुष्काळी भागातील भीषण चित्र उघड्या डोळ्यांनी पाहिले आणि माणदेशातील लोकांचे दु:ख, दारिद्र्याचे निवारण करण्यासाठी ध्यास घेत रात्रंदिवस परिश्रम घेतले. माण देशी फौंडेशनच्या माध्यमातून म्हसवड परिसरातील गावांमध्ये नऊ अद्ययावत बंधारे कोट्यावधी रुपये खर्चून बांधले आहेत. त्यामध्ये सरासरी सुमारे प्रति बंधारा ९ कोटी लिटर इतका पाणी साठवणक्षमता असून माण देशीने बांधलेल्या बंधाऱ्यांमुळे ९०१ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले आहे. शेतकऱ्यांच्या शिवारात हरितक्रांती झाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत आहे. शेतकरी त्यांच्या शेतात विविध पिकांचे भरघोस उत्पन्न घेत आहेत.

**फार्म टू मार्केट:-** "फार्म टू मार्केट" या उपक्रमाची सुरुवात नोव्हेंबर २०१६ पासून सुरु झाली. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना स्वावलंबी बनविणे व त्यांचे उत्पन्न वाढविणे हा आहे. फार्म टू मार्केट द्वारे शेतकऱ्यांचा माल जागेवर बाजारभावाप्रमाणे विकत घेतला जातो. त्याचे ग्रेडिंग केले जाते व त्याला मोठी बाजारपेठ मिळवून दिली जाते. उपक्रमामध्ये नियुक्त केलेले समन्वयक शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतात, आधुनिक तंत्राने शेती कशी करावी, मालाचा भाव कसा ठरवावा, शेतमाल एक्सपोर्ट करण्याची प्रक्रिया, शाश्वत शेती कशी करावी व वेळोवेळी बाजारातील भावाच्या चढ-उताराची माहिती प्रशिक्षण शिबिराद्वारे देतात. या उपक्रमाद्वारे ४०० शेतकऱ्यांना लाभ झालेला आहे.

## पुरस्कार व ओळख:-

- दि. १३ एप्रिल २०१७ रोजी महिला विभागाअंतर्गत ग्रामीण महिलांच्या आर्थिक प्रगती व उन्नतीसाठी योगदान देणाऱ्या व सामाजिक कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी आय एम सी चेंबर ऑफ कॉमर्स या संस्थेच्यावतीने पुरस्कार देण्यात येतो. २०१७ चा पुरस्कार श्रीमती चेतना सिन्हा यांना मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते देवून गौरविण्यात आले.
- दि. २८ मार्च २०१७ रोजी वर्ल्ड सेंटर मुंबई येथे झालेल्या सहाव्या ''ग्लोबल इकोनॉमिक समिट'' मध्ये गृहराज्य मंत्री मा. श्री. दिपक केसरकर यांच्या हस्ते माण देशी महिला बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. रेखा कुलकर्णी यांना ''नारी शक्ती'' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# आभार

सध्याच्या बँकींग क्षेत्रातील जागतिक स्पर्धेमध्ये वाढती जबाबदारी स्विकारुन, अग्रेसर राहण्याचा विश्वास आपणा सर्वांमध्ये निर्माण झाला आहे. विविध प्रकारच्या ठेवी व कर्जवाटपाच्या योजना राबवून सभासदांची आर्थिक व सामाजिक प्रगती करताना त्यांच्या शैक्षणिक व आरोग्याच्या बाबींकडे लक्ष द्यावयाचे आहे. या कामात सर्व सहकारी संस्था,संचालिका,सेवकवर्ग, सभासद, ठेवीदार,कर्जदार व हितचिंतक यांचे पूर्ण सहकार्य लाभेल असा विश्वास आहे.

मी वैयक्तिकरित्या मा. श्री. उर्जित पटेल,भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, मा. श्रीमती उषा थोरात माजी डेप्युटी गव्हर्नर भारतीय रिझर्व्ह बँक मुंबई, मा.डॉ. श्री. के. सी. चक्रवर्तीसाहेब माजी डेप्युटी गव्हर्नर भारतीय रिझर्व्ह बँक मुंबई, मा.श्री. बी.पी. कानूनगो डेप्युटी गव्हर्नर भारतीय रिझर्व्ह बँक मुंबई, मा.श्री. अरुण पसरिचा मुख्य महाप्रबंधक भारतीय रिझर्व्ह बँक मुंबई, मा. श्री. अनिल शर्मा, सल्लागार सांख्यिकीय आणि माहिती व्यवस्थापन विभाग भारतीय रिझर्व्ह बँक मुंबई, मा. श्री. विजय झाडे महाराष्ट्र राज्य सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,पुणे श्रीमती मीना हेमचंद्र, कार्यकारी संचालक भारतीय रिझर्व्ह बँक मुंबई, मा.श्वेता सिंघल जिल्हाधिकारी सातारा, मा. डॉ.श्री. महेश कदम जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सातारा, मा. श्री. संदीप पाटील पोलीस अधिक्षक सातारा, मा. श्री. राजेश देशमुख मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सातारा, मा. श्री. एस. जी. गावडे सहा. निबंधक सहकारी संस्था दहिवडी, भारतीय रिझर्व्ह बँकेचे आजी माजी अधिकारी वर्ग, मा. श्री. विद्याधर अनास्कर अध्यक्ष महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन मुंबई, सौ. सायली भोईर मुख्य कार्यकारी व सचिव महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन मुंबई, महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक मुंबई, मा.श्री. अजय माधवराव देशमुख,लेखापरिक्षक अधिकारी सातारा,बँक ऑफ इंडियाचे अधिकारी वर्ग,सातारा जिल्हा नागरी बँक असोसिएशन सातारा, जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. सातारा, आय.डी.बी.आय.बँक, एस.बी.आय.बँक, ॲक्सिस बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, यस बँक पुणे, सीडबी मुंबई, कायदेविषयक सल्लागार, लेखापरिक्षक, अंर्तगत लेखापरिक्षक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि.,वृत्तपत्र संपादक, सातारा व पुणे जिल्हा वार्ताहर, महाराष्ट्र शासन, तसेच बँकेच्या प्रगतीस प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रितीने सहकार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचे हार्दीक आभार !

धन्यवाद !

जयहिंद ! जय महाराष्ट्र ! ज़य सहक़ार !

आपली स्नेहांकित
**श्रीमती चेतना सिन्हा**
अध्यक्षा




दि. २१ ऑक्टोबर २०१६ रोजी सीएनबीसी टीव्ही १८ व युनियन बँक ऑफ इंडिया आयोजित, "Financial Inclusion" या कार्यक्रमामध्ये ग्रामीण भारतीय महिलांना कार्यक्षम व उद्योजिका बनविण्याच्या उद्देशाने देण्यात आलेला पुरस्कार मा. श्री. बिमल जालन, माजी गव्हर्नर आरबीआय यांच्या हस्ते माण देशी महिला बँकेच्या सभासद सौ. केराबाई सरगर यांनी स्विकारला समवेत मा. शिरीन भान व्यवस्थापकीय संपादक सीएनबीसी टीव्ही १८, मा. श्री. अशोक लवासा, वित्त सचिव भारत सरकार व श्रीमती चेतना सिन्हा आणि सौ. रेखा कुलकर्णी




दि. ११ एप्रिल २०१७ रोजी महिला दिनाचे औचित्य साधून वर्ल्ड बँक ग्रुपच्या आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळ (IFC) तर्फे आयोजित परिषदेमध्ये मा. हेन्रीएट कोल्ब प्रमुख, (Head, IFC Gender Secretariat) मा. रोशिका सिंग (Gender Specialist, IFC) समवेत सौ. रेखा कुलकर्णी मुख्य कार्यकारी अधिकारी, माण देशी बँक




दि. १७ जानेवारी २०१७ रोजी नाबार्ड तर्फे ''आर्थिक साक्षरता प्रशिक्षण'' कार्यक्रम राबविण्यात आला त्याप्रसंगी उपस्थित मा.श्री. सुबोध अभ्यंकर, जिल्हा विकास व्यवस्थापक नाबार्ड, सातारा यांनी मार्गदर्शन केले, समवेत माण देशी महिला बँक कर्मचारी




दि. ०७ जानेवारी २०१७ रोजी मुंबई येथे झालेल्या माण देशी महोत्सवास मुख्य न्यायमुर्ती मुंबई उच्च न्यायालय मा. श्री. सत्यरंजन धर्माधिकारी, मा. श्रीमती सुरेखा मरांडी, कार्यकारी संचालक रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व मा. श्री. अनिल के. शर्मा, मुख्य महाप्रबंधक रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी भेट देवून महिलांशी हितगूज केले समवेत श्रीमती चेतना सिन्हा व सौ. रेखा कुलकर्णी



दि. १५ मे २०१७ रोजी ''एक्स्टर विद्यापीठ'' लंडन येथील भेटी दरम्यान अर्थशास्त्र प्राध्यापक मा. ब्रिट ग्रोस्स्कोप, श्री. सुरजित चक्रवर्ती, श्री. प्रदीपकुमार व श्री. सुमेध दलवाई यांना श्रीमती चेतना सिन्हा व सौ. रेखा कुलकर्णी यांनी माण देशी बँकेच्या कार्याची माहिती देवून विद्यापीठास संशोधनासाठी माण देशी बँकेच्या केस स्टडीज् दिल्या.




दि. २४ मे २०१७ रोजी ब्रिटनचे माजी पंतप्रधान मा. टोनी ब्लेअर यांच्या पत्नी श्रीमती चेरी ब्लेअर, चेरी ब्लेअर फौंडेशन फॉर वुमेनच्या संस्थापिका यांनी माण देशी बँकेस भेट देवून महिलांशी हितगूज साधले सोबत श्रीमती चेतना सिन्हा, माण देशी बँकेच्या संचालिका सौ. रेखा कट्टे व मुख्य प्रशासन अधिकारी सौ. वनिता शिंदे



दि. ०८ ऑगस्ट २०१७ रोजी माण देशी बँकेच्या म्हसवड शाखेमध्ये ''एटीएम मशीन''ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. त्याप्रसंगी बँकेच्या ग्राहक मशीनद्वारे व्यवहार करतानाचे छायाचित्र



दि. ०५ जानेवारी २०१७ रोजी ''माण देशी महोत्सव'' मुंबईच्या शुभारंभ प्रसंगी माजी न्यायमुर्ती पद्मभूषण मा. श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी, मा. श्री. विनोद तावडे, उच्च व तांत्रिक शालेय व सांस्कृतिक कार्यक्रम मंत्री महाराष्ट्र राज्य, मा. श्री. धीरुभाई मेहता, अध्यक्ष, बृहद भारतीय समाज मुंबई व श्री. आशुतोष गोवारीकर, चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माते यांच्या समवेत श्रीमती चेतना सिन्हा व माण देशी बँकेच्या संचालिका




दि. ३० नोव्हेंबर २०१६ रोजी नोट बंदीच्या काळात आठवडा बाजारामध्ये सुट्ट्या पैशांच्या उपलब्धतेसाठी माण देशी बँकेने राबविलेल्या उपक्रमाची माहिती ''सेंट जेवियर कॉलेज, मुंबई'' येथे व्याख्यानात बँकेच्या सीईओ सौ. रेखा कुलकर्णी यांनी दिली समवेत श्री. आशिष सोमैया, व्यवस्थापकीय संचालक व सीईओ, मोतीलाल ओसवाल असेट मॅनेजमेंट कं. लि. मुंबई, श्री. विश्वास उदगी, उपाध्यक्ष अखिल भारतीय बँक कर्मचारी संघटना, श्री. संजय जोग, बिझनेस स्टँडर्ड वृत्तपत्राचे सहकारी संपादक, श्री. अभय मोकाशी, विभाग प्रमुख कम्युनिकेशन फॉर डेव्हलपमेंट



दि. १२ एप्रिल २०१६ रोजी मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी ब्रिटनचे प्रिन्स विलियम व प्रिन्सेस केट मिडलटन यांच्या स्वागताप्रित्यर्थ हैद्राबाद हाऊस, नवी दिल्ली येथे आयोजित केलेल्या शाही मेजवानीस निमंत्रित श्रीमती चेतना सिन्हा



दि. १३ एप्रिल २०१७ रोजी महिला विभागाअंतर्गत ग्रामीण महिलांच्या आर्थिक प्रगती व उन्नतीसाठी योगदान देणाऱ्या व सामाजिक कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थाना प्रोत्साहन देण्यासाठी आय एम सी चेंबर ऑफ कॉमर्स या संस्थेच्यावतीने पुरस्कार देण्यात येतो. २०१७ चा पुरस्कार श्रीमती चेतना सिन्हा यांना मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते देवून गौरविण्यात आले.

माण देशी बँक

Under Certificate of Posting

| | |
|---|---|
| प्रेषक :<br>**श्रीमती चेतना सिन्हा**<br>अध्यक्षा, माण देशी महिला सहकारी बँक लि.<br>म्हसवड, ता. माण, जि. सातारा.<br>फोन : (०२३७३) २७०१४१,<br>फॅक्स : (०२३७३) २७०७८८<br>website : www.manndeshibank.com<br>email : bank@manndeshi.org.in | सभासद क्र.      बुक पोस्ट<br><br>प्रति,<br>सौ./श्रीमती |
| मुद्रक :<br>**ओम प्रिंटर्स, म्हसवड**<br>फोन : (०२३७३) २७०२८८ | |